वाचनालय
का.वा
२३७४
१०।१।९०

म. सं. म. डावे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
क्र. २३७४ दिनांक १०।१।९०
विषय का.वा. क्र. . . . .

BVBK-0402374

# क्रांतिकारकांच्या कथा

## भाग २

द. दा. जोशी

BVBK-0402374

मॅजेस्टिक प्रकाशन

पहिली आवृत्ती :
जून १९८९

© द. दा. जोशी
७, पद्मरेखा सोसायटी
' आशीर्वाद '
कर्वेनगर, पुणे ४११ ५२

मुखपृष्ठ राम वाईरकर

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
२१६, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुद्रक
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ शनिवारपेठ
पुणे ४११ ०३०

मूल्य :
१८ रुपये

# काळाची गरज

आजच्या युवकाना स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वदेशाभिमानी व स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी प्राणार्पण करणाऱ्या क्रांतिकारकांची फारशी माहिती नसावी. ती त्याना व्हावी व भारतीय स्वातंत्र्येतिहासातील महत्त्वाच्या घटना कळाव्या ह्या हेतूने मी 'क्रांतिकारकाच्या कथा' या नावानं दोन पुस्तकं, शक्य तितक्या सोप्या भाषेत लिहिण्याचा यथामती प्रयत्न केला आहे.

भूतकाळातील देशभक्ताचा व क्रांतिकारकांचा त्याग, कष्टाची पराकाष्ठा, ध्येयसिद्धीचा पाठपुरावा, अन्यायाची चीड, कमालीचा मनोनिग्रह, खडतर प्रसंगातून पुढे जाण्याची जिद्द या गोष्टींचा युवकांनी विचार करणं ही काळाची गरज आहे.

माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांत व इतर छोट्यामोठ्या वाचनालयात ही दोन्ही पुस्तकं ठेवली, तर मुलाना वाचता येतील. त्यातून काहींना स्फूर्ती मिळेल व भावी काळात तेजस्वी तारे चमकलेले दिसतीलही—तसे दिसावे ही काळाची गरज आहे!

पालकानी आपल्या पाल्याच्या वाढदिवशी त्याला ही दोन पुस्तकं भेट म्हणून दिली तर त्यालाही गतकाळातील या स्फूर्तिप्रद घटना कळतील. घरातील इतरा-नाही ही पुस्तकं वाचता येतील

'क्रांतिकारकांच्या कथा' लिहिताना मला, फर्ग्युसन कॉलेजचे निवृत्त प्राध्यापक व टिळक रोड न्यू इंग्लिश स्कूलचे माजी प्रमुख, डॉक्टर द. न. गोखले, यानी दिलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

— द. दा. जोशी

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १२. विनायक नारायण देशपांडे | १०१ |
| १३. विष्णू गणेश पिंगळे | १०४ |
| १४. भगतसिंग | ११२ |
| १५. हत्याकांड | ११७ |
| १६. सुखदेव | १२० |
| १७. शिवराम राजगुरू | १२२ |
| १८. आग भडकली ! | १२४ |
| १९. खुनास खून ! | १२७ |
| २०. भूकंपाचा हादरा | १२९ |
| २१. शेवटचा निरोप | १३२ |
| २२. नेताजी सुभाषचंद्र बोस | १३५ |
| २३. स्वातंत्र्यवीर सावरकर | १५१ |

# १२. विनायक नारायण देशपांडे

ओ ळ ख

विनायकराव हे कृष्णा कर्वे यांचे निकटचे स्नेही. ते नाशिकजवळच पंचवटी येथील इंग्रजी शाळेत शिक्षक होते. त्या शाळेतील गुणी शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. सर्व मुलांतही ते मोकळेपणानं वावरत. कुणाची काही शंका असली, तर ती त्याला समजुतीनं नीट पटवीत. विनायकराव बोलायला खडीसाखरेसारखे गोड, पण शिस्तीत मात्र खारकेसारखे चिवट! स्वतः नियमितपणानं येणारे व मुलांनाही त्याच-प्रमाणे शाळेत यायला लावणारे.

कृष्णा कर्वे यांच्या नित्य सहवासामुळे अनंतराव कान्हेरे यांचाही चांगला परिचय झाला होता. त्यांच्या घरीही विनायकरावांचं जाणंयेणं होतं. त्यांचे विचार ऐकायला मिळत होते. ते ऐकून त्यांची मनःस्थिती द्विधा होई. खुदिराम बोस यांच्या साहसाची हकीगत ऐकून त्यांचं मनही अस्वस्थ बने. इंग्रजी राज्यकारभार किती फसवा व स्वार्थी आहे हे त्यांनाही पटलं होतं. इंग्रजांना विरोध करणं हे काम चारदोन व्यक्तींच्या हातात नव्हतं; पण निषेध करून असंतोष वाढवणं हे मात्र करता येणं अशक्य नव्हतं. कान्हेरे यांची गुप्त खलबतं त्यांना आता उघडपणे कळू लागली होती. ती त्यांना पटत होती. त्यांच्या गुप्त संस्थेत आपणही सहभागी व्हावं व मातृभूमीसाठी जे काही करता येईल ते करावं हा विचार आता बळावला होता.

विनायकराव देशपांडे विवाहित होते संसाराचा पाश एकदम कसा

तोडावा याची चिंता त्यांच्या विचारांना अडसर घालीत होती, पण उत्कठा कमी होत नव्हती. देशपांडे यांनी घरी एक छोटासा व्यवसाय चालू ठेवला होता. हातमागावर कापड विणायचं व विकायचं. त्या व्यवसायात त्यांना बरी कमाई होत असे. शिवाय दहाबारा मुलगे व मुली हातमागावर विणकाम शिकण्यास येत असत, त्यांच्याकडूनही ठरावीक पैसे मिळत असत. त्या पैशातून पत्नीचा नित्य खर्च भागण्यासारखा होता, त्यामुळे तिच्या चरितार्थाची काळजी करण्याचं कारण नव्हतं. पत्नीला या कामाची माहिती होती.

अनतराव कान्हेरे याचं बोलणं अगदी मधासारखं. त्यांच्या बोलण्यातच अशी मोहिनी होती, की ते ऐकून कुणालाही मोह पडावा. देशसेवेचं व्रत घेतल्यावर अखेरपर्यंत ते अखंड टिकवणं हे प्रत्येकाचं कर्तव्य होतं. माघार घेणं कुणालाच माहीत नव्हतं. प्रत्येकानं आपलं काम अगदी गुप्तपणानं करण्याची शपथ घेतली होती. विनायकराव देशपांडे हे आता त्या संस्थेचे सक्रिय सदस्य झाले होते. जिवावर उदार होऊन काम करणार होते असा हा उमदा तरुण बावीस-तेवीस वर्षांचा होता. तो संसारातून उठला. भारताच्या पायांतील पारतंत्र्याची बेडी तोडण्यासाठी अनतरावांबरोबर वाटेल ते साहस करण्यास निर्भयतेनं तयार झाला.

विनायक बराबरच त्यांचे दोन मित्रही या गुप्त संस्थेत स्वयस्फूर्तीनं आले होते. दोघेही तितकेच करारी व निग्रही होते. विनायकरावां-बरोबर अनेव पं आखाड्यात व्यायाम करीत होते. त्यातील एक शंकर सोमण व ( ) वामनराव जोशी ( दाणी ). या दोघांच्या धाडसी विचारांची वा ा पुढे गणू वैद्य याला कळली व तोही नंतर संस्थेत आला.

सर्वांचे वि ( बरोबर जुळल्यानंतरच ते पुढच्या कृतीत उतरत असत. मग ते काम ान की महान याचा प्रश्नच उरत नसे. तरीसुद्धा सर्वां-पेक्षा अनतरा कान्हेरे हे जास्त दूरदर्शी होते. धोरणी होते. परिस्थितीचा

पूर्ण विचार करून ते त्या क्षेत्रात उतरत असत. मुळमुळीत धोरण व बुळबुळीत विचार ही अपयशाची लक्षणं आहेत, असं ते आपल्या सहकाऱ्यांना नेहमीच सांगत. त्यांचा दूरदर्शीपणा सर्व सहकाऱ्यांनी अनुभवला होता, म्हणूनच ते त्या संस्थेत अग्रेसर होते. सर्वांना समजुतीनच पुढे जायचा ते सल्ला देत. स्वतःही त्यात पूर्णपणे समरस होत.

शिवाजीमहाराजापासून स्फूर्ती, समर्थ रामदासस्वामींकडून युक्तिवाद आणि आतापर्यंतच्या क्रांतिकारकांनी दाखवलेली साहसी वृत्ती यांतूनच आपल्याला पुढची वाटचाल करायची आहे; वाट खडतर असली, तरी शेवटपर्यंत याच वाटेनं चालावं लागणार आहे; इंग्रज मुत्सद्द्यांना यातूनच दहशत बसणार आहे; क्रांतिकारकांच्या कृतीतून नवा प्रकाश दिसणार आहे, याची त्या सर्व युवकांना खात्री होती.

अनंतराव व कर्वे यांनी जॅक्सनचा काटा कायमचा दूर करण्याची योजना आखली होती. त्या योजनेत आता विनायकराव देशपांडेही सामील झाले होते. सर्व पूर्वतयारी झालेली होतीच. दिवस कोणता तेही ठरलेलं होत. त्या ठरलेल्या दिवशी व ठरलेल्या वेळी या तिघांच्या एकजुटीनं पुढचं सर्व काम कसं पार पडलं ती सविस्तर माहिती 'अनंतराव कान्हेरे' या प्रकरणात दिलेली आहे. त्याची पुनरावृत्ती न करताच हे प्रकरण पुरं करीत आहे.

## १३. विष्णू गणेश पिंगळे

क्रांतिकारकांच्या चळवळीत भाग घेऊन, भारताची पारतंत्र्यातून सुटका व्हावी म्हणून प्राणपणाने झटणारा विष्णू! त्याची साहसी कृती इतराप्रमाणेच प्रभावी होती. अशा साहसी कामात कमालीचं मनोधैर्य व निग्रह लागतो, हे मागच्या प्रत्येक प्रकरणातून पटलं असेलच. ते मनोधैर्य विष्णूच्या बाबतीतही दिसून येईल.

विष्णू गणेश पिंगळे यांचे वाडवडील पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे येथे राहात असत. विष्णूचे आजोबा गोविंदराव हे त्या काळी एक नाणा-वलेले वकील म्हणून प्रसिद्ध होते. न्यायालयात काम करताना त्यांची छाप आपोआप दिसून येई पैसेही उत्तम मिळत घरची राहाणी थाटाची होती.

गोविंदरावांचे चिरंजीव गणेशपंत. याच गणेशपंताचा मुलगा विष्णू. घरची मूळची स्थिती उत्तम होती, तरी वाढत्या प्रपंचामुळे व गणेशपंत स्वत: घरच्या कारभारात लक्ष घालत नसल्यामुळे ती स्थिती घसरू लागली होती.

गणेशपंतांना चार मुलगे होते. पाच मुली होत्या. घरचा व्याप वाढला होता, पण आवक वाढत नव्हती. खर्च मात्र खूपच वाढत होता. तो कमी कसा करणार !

विष्णूचा जन्म सन १८८८ मध्ये झाला. सुरुवातीला त्याची प्रकृती बरी होती. तो थोडा मोठा, पाचसहा वर्षांचा झाल्यावर त्याची लहानपणाची दुखणी वाढू लागली. बरेच दिवस ती अंगावरच काढली. पुढे वैद्यांचं औषध व आईकडून मिळणारी सेवा यांमुळे ती ताळ्यावर आली.

वैद्यराजानी त्याला नियमित व्यायाम करायला सांगितलं. ' व्यायाम हेच तुझ खरं औषध ' असं त्याला पटवलं.

विष्णूनं तो मंत्र नीट लक्षात ठेवला. सुरुवातीला तो घरी नुमते नमस्कार घाली. वाढत्या वयाबरोबर त्यांत वाढ झाली व शेवटी त्याचं शरीर पिळदार बनलं व ते अखेरपर्यंत टिकलं. जोर-जोडी बैठका यांच्या-बरोबर नेमबाजीचं शिक्षणही त्यानं घेतलं. त्याचं व्यक्तिमत्त्वही उत्तम होतं.

विष्णूचं प्राथमिक शिक्षण त्याच्या गावीच झालं. पण पुढच्या शिक्षणाची तिथे सोय नसल्यामुळे तो पुण्यात येऊन शिक्षण घेत होता. शाळेत त्याची बुद्धिमत्ता गुरुजींना पटली होती. वर्गातील एक हुशार विद्यार्थी म्हणून तो समजला जाई. पण स्वतःच्या हुशारीचा त्याला कधीच गर्व नव्हता.

काही दिवस पुण्यात शिक्षण घेतल्यावर त्याचं मन राष्ट्रीय शिक्षणा-कडे ओढ घेऊ लागलं. पुढे तो कोल्हापूरला गेला. तिथे विजापूरकर यांच्या शाळेत त्याचं पुढचं शिक्षण सुरू झालं.

हे शिक्षण घेत असताना स्वातंत्र्याचे वारे भारतात वाहात होते. ती माहिती विष्णूलाही कळत होती. स्वातंत्र्यसिद्धीसाठी आपणही काही तरी केलं पाहिजे ही ऊर्मी त्याच्या मनात उसळत असे. शिक्षण सोडून तिकडे जायचं की ते पुरं करून जायचं हा विचार मात्र कायम ठरत नव्हता. खूप विचार केला व त्यानं प्रथम शिक्षण पूर्ण करण्याचाच निश्चय केला.

विष्णूच्या मनात इंजिनिअर होण्याची इच्छा होती. पण घरच्या प्रतिकूल परिस्थितीत ते शक्य नव्हतं. तरीसुद्धा रिकाम्या वेळात खासगी नोकरी करून पैसे मिळवण्याचा त्याचा उपक्रम चालू होता. परदेशात जायचं म्हणजे निदान पैशाची सोय करायला हवीच. त्याच दृष्टीनं त्याचे प्रयत्न चालू होते. काटकसरीनं राहून शक्य तितके जास्त पैसे तो

बाजूला राखून ठेवीत असे.

प्रवासापुरती व्यवस्था झाल्यावर त्यानं अचानक अमेरिकेला जायचा निश्चय केला. तसं घरात सांगितलं. पण घरातून विरोधच होत होता. त्याच्या निग्रही वृत्तीला तो पटला नाही. त्यानं आपला विचार बदलला नाही!

विष्णू पुण्याहून मुंबईला गेला. तिथून पुढे बोटीने १९११ च्या ऑक्टोबरमध्ये अमेरिकेला उतरला. अमेरिकेचं झगमगत स्वरूप पाहून सुरुवातीला त्याला बुजल्यासारखं वाटलं. पुढे सर्व अंगवळणी पडलं. अमेरिकेत सिॲटल येथे गेल्यावर एका महाराष्ट्रीयाकडेच तो उतरला होता. ते पुण्याहूनच पूर्वी तिकडे गेलेले होते. त्यांची थोडी ओळखही होती.

अमेरिकेला जाण्यापूर्वी विष्णूचं कॉलेजचं शिक्षण पुरं झालं नव्हतं व ते पूर्ण झाल्याशिवाय इंजिनिअरिंगला प्रवेश नव्हता. त्यानं आवश्यक ते कॉलेजशिक्षण पुरं केलं व सिॲटल सोडून तो वॉशिंग्टनला गेला. तेथील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पुढचं शिक्षण घेण्यास सुरुवात झाली. कॉलेजच्या शिक्षणाची फी ऐकून प्रथम तो थोडा बावरला, पण त्याचा निश्चय कायम होता. ओळखी वाढत होत्या. एका गिरणीत काही वेळ काम करून त्यानं आपली पैशाची गरज भागवली.

वॉशिंग्टनला शिक्षण घेत असतानाच विष्णूच्या विचारांना अगदी अचानक कलाटणी मिळाली. स्वातंत्र्यवीर सावरकर हेही इंग्लंडमध्येच अभ्यासासाठी गेले होते. त्यांची भारताच्या स्वातंत्र्यासाठी धडपड चालू होती. अनेक भारतीय युवकांना त्यांनी आपल्या प्रभावी भाषणांनी मंत्रमुग्ध करून टाकलं होतं पुढे त्यांनी तिथेही 'अभिनव भारत'-सारखं च गुप्त संस्था सुरू केली. तिथे त्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची अनेक वेळा भेट होई. पुढच्या योजना ठरत. स्वातंत्र्यवीरांच्या ओजस्वी

वाणीतील विचार वर्तमानपत्रांतून मधून मधून कळत. ते वाचून विष्णुपंतांची मनःस्थिती द्विधा बने. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे एक निकटचे सहकारी लाला हरदयाळ हे त्या वेळी अमेरिकेत होते. अशीच एकदा विष्णुपंत पिंगळे यांची व त्यांची भेट झाली. लालाजी हे मोठे मुत्सद्दी व दूरदर्शी होते. 'सशस्त्र क्रांतीशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही' हा सावरकरांचा विचार त्यांना पुरेपूर पटलेला होता. त्याच विचाराने त्यांची पावल पुढे पडत होती. अगदी निग्रही वृत्तीन.

अमेरिकेत लालाजींची भाषण विष्णुपंत ऐकत होते. त्या भाषणांनी ते प्रभावित होत होते पुढे त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. ते लालाजींच्या चळवळीत सहभागी झाले. लाला हरदयाळसिंग यांना असा उमदा व निर्भय तरुण हवाच होता. लालाजींनी त्याच कौतुक केलं. आपले विचार नीट पटवून दिले. या कामात धोका आहे हे समजावून सांगितलं, "ही सर्व तयारी असेल, तरच या चळवळीत पड. मागाहून तुला कधी पश्चात्ताप होऊ नये, ही मनाची तयारी ठेव."

विष्णुपंतांनी दूरवर विचार करूनच आपला निर्णय ठरवला होता. लालाजींना त्यांनी सर्व पटवून दिल होतं. त्यांनी अमेरिकेतून भारतात परत यायच ठरवल होत. सन १९१४ च्या नोव्हेंबर महिन्यात ते परत भारतात आले.

भारतात परतल्यावर इथे त्यांचं प्रचारकार्य सुरू झाल. निरनिराळ्या गावी जाव, तरुणांना एकत्र बोलवावं, पारतंत्र्याचं दुःख सांगाव हा त्यांचा उपक्रम सुरू झाला. मुळात उत्तम व्यक्तिमत्त्व, साडेपाच फूट उंची, भरदार छाती, भेदक दृष्टी व बोलण्यातील माधुरी यांमुळे त्यांची भाषण ऐकण्यास झुंडी उसळत असत.

भारतात आल्यावर रासबिहारी या क्रांतिकारकाचा व विष्णुपंतांचा

घनिष्ट संबंध आला. पुढे दोघेही प्रचारकार्याला एकत्र जाऊ लागले. प्रचारकार्याला पैशाची अडचण पडत होती, ती या दोघांच्या प्रयत्नानं दूर होत होती. ते पंजाबात दौऱ्यावर गेले होते. तेथील धनिकाकडून व संस्थानिकाकडून त्यांना खूप पैसा मिळाला. त्याचबरोबर कंजूष सावकाराच्या घरावर रात्री सहकाऱ्याच्या साहाय्यानं धाडी घालून पैसे उभे करण्यास ते कचरत नसत हा सर्व पैसा देशकार्यासाठीच खर्च होत असे. एक पैसासुद्धा कुणी स्वतःसाठी घेत नसे !

विष्णुपंतांना बहुरूपी व बहुढंगी सोंग उत्तम प्रकारे वठवता येत असत त्यांना मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी व पंजाबी या भाषा उत्तम येत असत. त्या भाषांचा त्यांनी उत्तम अभ्यास केला होता. ज्या ज्या भागात जात, तेथील लोकांच्या मातृभाषेत ते उत्तम भाषणं करीत. इतकंच नव्हे तर त्या प्रांतातील लोकांसारखाच पोशाख करीत. हा मनुष्य महाराष्ट्रीय असेल, याची कुणाला कल्पनाच येत नव्हती. देश तसा वेश हे तंत्र त्यांना जमून गेलं होतं ! पण प्रचारकार्यासाठी महाराष्ट्रापेक्षा त्याना उत्तर भारत जास्त आवडे. लाहोर, लुधियाना, लखनौ, अमृतसर, जालंदर, अंबाला, मीरत, कलकत्ता ही ठिकाणं व आजूबाजूची शहरं हा सर्व भाग त्यांच्या पदयात्रेनं पार पडलेला होता.

सर्व काम योजनाबद्ध चालू होतं. पण या जगात 'फितुरी' हा एक गुप्त रोग दडून बसलेला असतो ! तो केव्हा उपटतो ते सांगता येत नाही आणि त्यानं डोकं वर काढलं, की कार्यकर्त्यांची डोकी मात्र सुन्न होऊन जातात ! विष्णुपंतांच्या गुप्त कारवायावर फितुरीचं सावट पडलं. कृपालसिंग हा त्यांच्या संघटनेत काम करणारा विश्वासघातकी बनला. त्यानं या गुप्त कटाची सर्व माहिती इंग्रज अधिकाऱ्यांना पुरवून स्वार्थाची पोळी पदरी पाडून घेतली.

पोलिसांच्या बंदोबस्तात सरकारी अधिकाऱ्यांनी क्रांतिकारकांच्या

ठिकाणांवर अचानक छापा घातला. काही हातबॉंब, शस्त्रं, कागदपत्रं जप्त केली. विष्णुपंत पिंगळे व त्यांचे सहकारी याना अटक केली. सर्वांच्या हातात हातकड्या घातल्या. सर्वांना पुढील तपासासाठी ताब्यात घेतलं.

विष्णुपंताना प्रथम मीरत इथे नेण्यात येऊन तिथल्या कारागृहात ठेवण्यात आलं. पोलीसचौकशीत त्याना खूप छळण्यात आलं. तरी ते बधले नाहीत. शेवटी मारझोड असह्य झाली. तरीसुद्धा विष्णुपंत गुप्त योजनांचा थांगपत्ता लागू देत नव्हते.

विष्णुपंतावर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांवर राजद्रोह, शस्त्रपुरवठा, लुटालूट, स्फोटक बाळगणं, बॉंब तयार करणं असे अनेक आरोप ठेवले गेले. या सर्व गुन्ह्यांचा अंतिम निर्णय न्यायालयातून होणार होता. पुढचं सर्व कामकाज लाहोर येथील कारागृहातच सुरू होतं (१९१५). हे कामकाज मेजर आयर्विन, मि. एलिस आणि रावबहादूर शिवनारायण या न्यायमूर्तींसमोर चालू होतं.

सर्व आरोपींचे जाबजबाब, उलटतपासण्या, वकिलांचे युक्तिवाद काटेकोरपणाने चालू होते. आरोप गंभीर होते. तरीही त्यांची रीतसर चौकशी करून, खात्री करून घेणं हे महत्त्वाचं होतं. या कटाचे मुख्य सूत्रधार विष्णू गणेश पिंगळे होते. सर्वांची कसून तपासणी चालू होती. या खटल्याचं काम पाचसहा महिने चालू होतं. तिथेही विष्णू गणेश यांनी आपली निर्भीड वृत्ती सोडली नव्हती "मी माझ्या देशासाठी योग्य तेच काम करीत होतो. ते माझं कर्तव्यच होतं." हेच त्यानी स्पष्ट सांगितलं होतं.

शेवटी न्यायाधीशांनी या खटल्याचा निकाल जाहीर केला. तो ऐकण्यास हजारो लोक उपस्थित होते.

या कटात गुंतलेल्या बावीस आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात आली. काहींना काळ्या पाण्याची व काहींना सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली.

ती शिक्षा ऐकून बाहेरचे लोक हळहळत होते, पण विष्णू गणेश व त्यांचे सर्व सहकारी यांची मनःस्थिती पूर्ण शांत दिसत होती. लोकांना हा चमत्कारच वाटत होता !

आपल्या मुलाला— विष्णूला— फाशीची शिक्षा झाल्याचं त्याच्या आईला कळलं. ते ऐकताच ती शुद्ध हरपून कोसळलीच. विष्णूचे बंधू महादेवराव यांनी तिला सावध केलं, धीर दिला व "तुला विष्णूशी एकदा शेवटचं भेटवून आणीन" असं तिला सांगून तिचं समाधान केलं. महादेवराव तिला घेऊन लाहोरला गेले. त्यांनी तुरुंगाधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी विष्णूला आईच्या भेटीसाठी गजांजवळ आणलं. पण त्याला पाहाताच पुन्हा तिची अवस्था अगदी केविलवाणी झाली. ती अगदी अखेरचे चार शब्द त्याच्याशी बोलली. पुढे तिचा कंठ भरून आला. शब्द उमटणं अशक्य झालं. आई व महादेवराव जड अंतःकरणानं परत फिरले !

विष्णू गणेश पिंगळे यांना फाशी देण्याचा दिवस मंगळवार, १६ नोव्हेंबर १९१५ हा ठरला होता. सर्व पूर्वतयारी आधीच झाली होती. १५ तारखेला सोमवारी विष्णू गणेश यांना पूर्वसूचनाही दिली होती. ती ऐकूनही विष्णू गणेश यांची मनःशांती ढळली नव्हती.

सकाळी विष्णू गणेश यांच्या हातापायांत बेड्या घालून त्यांना वधस्तंभाकडे नेण्यात आलं. तिथे आल्यावर मुख्य अधिकाऱ्यांनी त्यांना अखेरची इच्छा विचारली. घरी काही निरोप असेल, तर तोही विचारला.

विष्णू गणेश यांनी निर्भयतेनं सांगितलं की, "माझ्या हातापायांतील बेड्या काढून मला सूर्यनारायणाची शेवटची प्रार्थना करण्याची परवानगी द्या !"

अधिकाऱ्यांनी ती विनंती मान्य केली. विष्णू गणेश यांनी आपले

दोन्ही हात जोडले. सूर्यनारायणाला भक्तिभावानं नमस्कार केला. क्षणभर डोळे मिटले. शांतपणानं प्रार्थना करताना त्यांच्या मुखातून गंगोत्रीच वाहात होती : "परमेश्वरा, माझ्या मातृभूमीसाठी मी जे केलं ते तुला माहीत आहेच ! मला मृत्यूची मुळीच खंत वाटत नाही. मी माझं कर्तव्य करण्यात कसलीच चूक केलेली नाही. माझा भारत दास्यातून मुक्त झालेला दिसेल तेव्हाच माझ्या आत्म्याला खरी शांती मिळेल !"

प्रार्थना संपली होती. विष्णू गणेश वधस्तंभाची एकेक पायरी मागे टाकून वर गेले. फासात मान अडकवली. खालची फळी मागानं सरकवली. काही क्षणातच त्यांची जीवनज्योत मालवली. त्यानंतर त्यांच्या इतर सहकाऱ्यांनाही निरनिराळ्या वेळी फासावर लटकावलं गेलं.

हाती घेतलेला उठाव अपुरा राहिला होता. तरीसुद्धा इंग्रजलोकांना भारतातील या युवकांनी दाखवलेल्या धडाडीचा कायमचा धसका बसला होता. पुढे काय होईल याचीच सर्वांना चिंता वाटत होती. ती अस्वस्थता कधीच कमी होणार नव्हती !

# १४. भगतसिंग

भारताची परतंत्र परिस्थिती, इंग्रज सरकारची गुलामगिरी व हुकूमशाही या सर्वच घटना स्वाभिमानी तरुणांना असह्य वाटत होत्या. आतापर्यंत क्रांतिकारकांकडून त्यांचा प्रतिकार होत होता. पण सत्तेपुढे त्यांचा टिकाव लागत नव्हता. या क्रांतिकारकांच्या उठावामुळे इंग्रज सरकारही हादरून गेलं होतं. तसं उघडपणे दाखवता येत नव्हतं, इतकंच!

अशा नव्या तरुणांपैकी एक निष्ठावंत तरुण भगतसिंग!

भगतसिंग याचा जन्म १९०७ साली पंजाब प्रांतातील लालपूरपासून जवळच्या एका खेडयात झाला. त्याच्या वडिलांचं नाव किशनसिंह व आईचं नाव विद्यादेवी.

भगतसिंगाचे वडील व चुलते क्रांतिकार्यातील अग्रणी म्हणून प्रसिद्ध होते भारताला स्वातंत्र्य मिळावं म्हणून ते अत्यंत तळमळीनं कार्य करीत होते पण सरकारची वक्र दृष्टी त्यांच्यावर खिळलेली होती. इंग्रज सरकारला गुंगारा देऊन भगतसिंगाचे काका अजितसिंग हे सन १९०८ पासून अज्ञातवासात होते. त्यांचा चेहरामोहरा बदललेला होता. त्यांनी नावही बदललं होतं. त्यांच्या गावातील कुणीही त्यांना आता ओळखलं नसतं; मग बाहेरची परिचित-अपरिचित मंडळी कशी ओळखणार? त्यांचं क्रांतिकार्य गुप्तपणे चालू होतं व त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांना ते त्यासंबंधी कळवीतही असत.

भगतसिंगाचे दुसरे चुलते स्वर्णसिंग. त्यांना सरकारनं बंडखोर म्हणून

पकडलं होतं. त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला होता. सरकारी चौकशी होऊन त्याना कारागृहात टाकलं गेलं. कारागृहातील न मानवणारं अन्न, तेथील छळ, हालअपेष्टा याना ते पुरते कंटाळून गेले होते. तशाच स्थितीत त्यांनी आपला देह सोडला. पण ते अमर झाले !

अशा परंपरागत क्रांतिकारकाच्या तेजस्वी कुळात भगतसिंग याचा जन्म झाला. वाडवडिलाचा हा क्रांतिकार्याचा वारसा पुढे त्यानही अतुल धैर्यान चालवला. भारताला स्वातंत्र्य मिळवण्याच्या कार्यात भगतसिंग तेजस्वी हिऱ्यासारखी चमकला. लहानपणी गोंडस व नाजूक रुपड असलेला भगतसिंग पुढे धाडसी वृत्तीनं आपला प्रभाव दाखवील, अस कुणालाच वाटल नव्हत ! पण घरी आलेल्या एका ज्योतिष्यानं ते भविष्य सांगितल होत. वडिलांना ते ऐकून समाधान वाटल होत.

भगतसिंगाचं वय वाढत होत. तो रूपान सुंदर होता. पण सडपातळ होता. पाणीदार डोळे, डोळ्यातील निश्चयी भाव, उंच कपाळ, कपाळावर झेपावणारे काळेकुळकुळीत केस, हसरा चेहरा यांमुळे कुणाही पाहाणाऱ्याच्या नजरेला भुरळ पडत असे.

भगतसिंगाला एक बहीण होती. तिच नाव अमरकौर. भगत तिला ‘ अमरा ’ किंवा ‘ कौर ’ या नावान हाक मारी व ती त्याला ‘ विरागी ’ अशी हाक मारी. दोघांचाही जीव एकमेकांत गुंतलेला असे.

भगतचं बालपण संपल. तो आता शाळेत जायला लागला. भगत रोज नियमान शाळेत जात होता. त्याच प्राथमिक शिक्षण त्याच्या गावीच सुरू झाल होत. रोजचा अभ्यास तो न चुकता करी. शाळेत वेळेवर जाई. गुरुजी सांगतील ते लक्ष देऊन ऐके. शंका आली तर गुरुजींना विचारी. त्याच बोलण गोड होतं. तो गुरुजींना फार आवडे. सर्व मुलांशी सलोख्यान वागे.

या शाळेत भगतच पहिल्या चारपाच इयत्तांचं शिक्षण पुरं झालं.

पुढच्या शिक्षणाची सोय त्या शाळेत नव्हती. दुसऱ्या गावी जाऊनच पुढचं शिक्षण घ्यायला हवं होत. पण भगतला दूर ठेवण्यास त्याची आई थोडी नाराज होती.

वडिलानी त्याला पुढच्या शिक्षणासाठी लाहोर इथे ठेवल. सर्व व्यवस्था उत्तम होती. तो आता इंग्रजी शाळेत जात होता. शाळेचं वातावरण प्रसन्न होत. सर्व गुरुजी उत्तम शिकवीत असत. भगत लक्षपूर्वक ऐकत असे. नियमित अभ्यास करीत असे. दरवर्षी उत्तम मार्क मिळवून वरच्या वर्गात जात असे.

शाळेतील अभ्यासाचा वेळ भराभर संपत होता. घरी आल्यावर भगतच्या मनात निराळेच विचार उसळत! ते विचार मनात आल्यावर तो गभीर दिसे. मागचा इतिहास त्याच्या डोळ्यांपुढे उभा राही. क्रांति-कारकांच्या बलिदानाची त्याला आठवण होई. भारतभूमीच्या मुक्ततेसाठी त्यानी इंग्रज सरकारला कसा प्रतिकार केला ते आठवे.

क्रांतिकारकांनी केलेले प्रयत्न का फसले, याचा विचारही त्याच्या मनात घोळत राही. शेवटी त्यालाही पटे, की क्रांतिकारकांच्या प्रयत्नांपेक्षा सत्तेचं सामर्थ्य प्रचड आहे. सत्तेच्या दंडुक्यानं कुणालाही अडवण्यात सरकारी अधिकारी तरवेज आहेत!

सत्ताधिकारी वरचढ बनले होते. उन्मत्त होते. क्रांतिकारकांची मनही स्वाभिमानानं पेटलेली होती. त्यांचाही निर्धार कायम होता. मूठभर क्रांतिवीरांनी इंग्रजी सत्तेला दिलेल्या धडका त्या अधिकाऱ्याच्या पोटात भीतीचे गोळे उठवीत होत्या!

सन १९२० मध्ये लो. टिळकांचं देहावसान झालं. स्वातंत्र्यासाठी त्यानी केलेले प्रयत्न व लोकजागृती यांचा अस्त झाला होता. त्यानतर महात्मा गांधींनी असहकाराचं व्रत स्वीकारून आपले प्रयत्न सुरू केले होते. अहिंसेवर त्यांचा दांडगा विश्वास होता. त्यांची तत्त्वनिष्ठा प्रखर

होती. ते म्हणत, की " माझ्या कृतीला तरुण रक्ताची उत्तम साथ मिळाली तर मी एकाच वर्षात स्वातंत्र्य मिळवून दाखवीन ! " त्यांचा आत्मविश्वास तरुणांना पटला होता. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक तरुण पुढे सरसावले होते.

भगतसिंगालाही आता स्वस्थ बसून चैन पडेना. त्यानं शाळा सोडली व या नव्या उपक्रमात तो सहभागी झाला. त्या वेळी तो नव-वीच्या वर्गात शिकत होता. गांधीजींचे प्रयत्न चालू होते. एक वर्ष संपल, पण प्रत्यक्ष परिणाम मात्र फारसा दिसलाच नाही ! सरकारला काही उपरती होईल ही आशा फोल ठरली. तरुणांच्या साऱ्या आशा मावळल्या. भगतसिंगानंही तो मार्ग सोडला व पुन्हा शाळेत जाऊन शिक्षण पूर्ण करण्यास सुरवात केली. आपल शिक्षण पूर्ण करणं हेच त्याला महत्त्वाचं कर्तव्य वाटलं. भगतसिंगान नेटान अभ्यास सुरू ठेवला. मॅट्रिकच्या परीक्षेत त्याला उत्तम यश मिळालं. पुढच्या शिक्षणाची वाट मोकळी झाली.

लाला लजपतराय यांनी लाहोर इथे सुरू केलेल्या 'राष्ट्रीय विद्या-पीठा'त भगतचं पुढचं शिक्षण सुरू झालं. त्याचा अभ्यास व्यवस्थित चालू होता. कॉलेजचं वातावरण मनाला उल्हसित करीत होतं. प्राध्यापक तळमळीन शिकवीत होते. दरवर्षी उच्च श्रेणी मिळवून भगतसिंग वरच्या वर्गात जात होता. दोन वर्षांचा काळ केव्हाच संपला होता. आता तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासाला सुरुवात होत होती.

किशनसिंहांनी व विद्यावतीदेवींनी मुलाचं लग्न करण्याचा विचार ठरवला होता. काही मुलींचे पालक तस विचारायला येत होते. किशन-सिंहांनी आपला विचार भगतसिंगाला सांगितला. भगतन त्या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. पुढच्या वाटा आपोआपच थांबल्या होत्या ! पुन्हा त्याचा अभ्यास व्यवस्थित चालू झाला.

सन १९२५ च्या सुमारास क्रांतिकारकांची एक नवी संघटना सुरू झाली होती. त्या संस्थेचे संस्थापक होते चंद्रशेखर आझाद. या संस्थेत बरेच तरुण सहभागी झाले होते. सर्वांचं ध्येय एकच होत : भारतमातेची पारतन्त्र्यातून मुक्तता करायची !

या संस्थेत सहभागी होणाऱ्या सहकाऱ्यांना चंद्रशेखर पुढच्या योजना पटवून देत. त्याप्रमाणे पुढची चक्रं फिरू लागत. मात्र या उपक्रमाची बाहेर कुणालाही एका शब्दानेही माहिती न देण्याची गुप्ततेची शपथ घ्यावी लागत असे. ती प्रत्येक जण घेत असेच !

या संस्थेची माहिती भगतसिंगाला कळली. त्याचं रक्त उसळलं : भारत-मातेच्या मुक्ततेसाठी तिच्या सुपुत्रांनी धाव घेतलीच पाहिजे ! मीही त्या चळवळीत जाईन व सर्व लोकांना पुढे चमत्कार दाखवीन ! इंग्रज सर-कारच्या मनावरची गुंगी दूर घालवलीच पाहिजे !

भगतसिंगानं कॉलेजला कायमचा रामराम ठोकला. चंद्रशेखरांची भेट घेतली. आपला हेतू सांगितला. भगतसिंगाला समोर पाहताच, चंद्र-शेखरांच्या मनाची खात्री पटली : 'हा युवक सामान्य नाही ! याचे डोळे बोलताहेत ते फक्त मलाच ऐकायला येत आहे ! '

भगतसिंग त्या गुप्तसंस्थेत लगेच दाखल झाला.

दा. क्र. 23608 दिनांक 9/7/08
विषय कथा

# १५. हत्याकांड

भगतसिंग आपल्या मित्राबरोबर अमृतसरला गेले होते. तिथून जालियनवाला बागेकडे गेले. पण बागेत पाय टाकण्यास त्या दोघांनाही धीर झाला नाही. तेथील दृश्य भयानक होतं !

त्या बागेत इंग्रजाच्या लष्करी सैनिकानी लोकांवर गोळ्या झाडण्याचा सपाटा चालवला होता. त्या लागून अनेक लोक जमिनीवर कोसळत होते. अनेकांनी प्राण सोडले होते. अनेक जण विव्हळत होते. थोड्याच वेळात तेही हे जग सोडून जात होते. बागेत रक्ताचा सडा सांडलेला होता. पाहाणाऱ्याच्या डोळ्यापुढे अंधार पसरत होता. भगतसिंगांनी तो प्रकार पाहिला. त्याच्या जिवाचा थरकाप उडाला. संताप अनावर झाला. पण त्या परिस्थितींत पुढे पाऊल टाकणं म्हणजे मरणच अंगावर ओढवणार होतं !

दोघांनीही तिथून दूरवर जाण्याचा विचार केला. आडरस्त्यानं ते जात होते. एका बोळाच्या तोंडाशी आले. पाहातात तो तिथेही तोच प्रकार !

एका बाजूला एक मनुष्य जीव तोडून ओरडत होता. एक सैनिक त्याच्या अंगावर आसुडाचे सटासट फटके मारीत होता. अंगाचं कातडं फाटून जात होत, तरी फटक्यांची गती थांबत नव्हती. भगतसिंग व त्यांच्या मित्राला भयकर चेव आला. ते दोघेही त्या सैनिकाच्या अंगावर धावून जाणार, तेवढ्यात मागून येणाऱ्या एका वृद्धानं त्यांना बळेच मागे ओढल. "पोरांनो, पाऊल पुढे टाकाल तर फुकट मराल ! त्या उन्मत्त माणसासमोर जाऊ नका. माझ ऐका. मागे फिरा !"

दोघाचा निरुपाय झाला. या अमानुष प्रकारानं भगतसिंगाच्या विचारांना नवी दिशा मिळाली. स्वतःचा कुठलाच विचार न करता या अमानुष वृत्तीचा पुरेपूर बदला घ्यायचा त्यांनी निश्चय केला. परत आल्यावर हा एकच विचार त्यांच्या मनाची अस्वस्थता वाढवीत होता. मागच्या क्रांतिकारकांचा इतिहास त्यांच्या मनात चेतना चेतवीत होता. त्याच्या मनामध्ये पुढच्या योजना ठरत होत्या.

भगतसिंगांनी आपल्या आयुष्यात दोन श्रद्धास्थानं जपली होती. दोघाबद्दलही त्यांच्या मनात नितांत आदर होता. त्याचा आदर्श दीप-स्तंभासारखा वाटत होता.

ती दोन श्रद्धास्थानं म्हणजे छत्रपती शिवाजीमहाराज व स्वातंत्र्यवीर सावरकर! त्या दोघांनी प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडा दिला होता.

भगतसिंगाप्रमाणेच त्या वेळच्या सर्वच क्रांतिकारकांची मनं इंग्रजांच्या राक्षसी वृत्तीला दोष देत होती. सर्वांच्या विचारानं पुन्हा उठाव करण्याची योजना ठरली. चंद्रशेखर आझाद यांच्याशी विचारविनिमय झाला. पुन्हा उठाव करून इंग्रजाच्या मनाला दहशत दाखवायची, त्याच्याशी झगडा सुरू करायचा, भारतमातेच्या मुक्तीसाठी जीव गेला तरी माघार घ्यायची नाही अशा निर्धारानं हे तरुण क्रांतिवीर पुढे सरसावत होते. 'माघार' हा शब्दच त्यांना स्पर्श करू शकत नव्हता!

भगतसिंगाचा आणखी एक विशेष गुण म्हणजे कुशलता. एखादी गोष्ट करण्याचा विचार मनात आला, की ती पुरी करण्याचा ते पिच्छाच पुरवीत. अडचणी आल्या तरी त्यांचं निरसन कसं करावं हे विचारपूर्वक पाहात. त्यामुळे अडचणींचा अडसर आपोआप दूर होई.

चंद्रशेखर यांच्या नित्याच्या सहवासातून दोघाना एकमेकांचे स्वभाव पटले होते. दोघेही मनमोकळेपणान चर्चा करीत. पुढच्या अडचणींचा विचार करीत. त्या दूर कशा करता येतील, याचा बरोबर अंदाज घेत.

नंतरच त्या प्रत्यक्ष कृतीत आणीत.

आपल्या कार्याचा व्याप वाढवण्यासाठी त्या दोघांना बाहेरगावी जावं लागे. चंद्रशेखर आपल्या भाषणातून तरुणांच्या मनावर अचूक छाप पाडीत. निष्ठेनं कार्य करण्यास काही तरुण तयार होत, त्यांना संस्थेत येता येई.

चंद्रशेखर यांच्या बोलण्यात नेहमीच आवेश असे. एकदा ते तळमळीनं बोलू लागले, की इंग्रजी सत्तेच्या अमानुषतेवर ते कडाडून तुटून

"आपणा सर्वांची भारतमाता ही श्रेष्ठ माता आहे. जन्मदात्या मातेची सेवाशुश्रूषा करताना तिचे सुपुत्र ज्या पोटतिडकीनं दक्षता घेतात, त्याच निष्ठेनं भारतमातेच्या मानेभोवती अनेक वर्षं आवळला गेलेला परवशतेचा पाश सोडवण्यास जर आजचे तरुण पुढे सरसावले नाहीत, तर या भारतमातेचा सतत कोंडमाराच नाही का होणार? परदास्यातून तिची मुक्तता करणं हेच आपणा सर्वांचं कर्तव्य आहे. मी पुढे चाललो आहे. भगतसिंग माझ्या मागोमाग येत आहेत. असे अनेक भगतसिंग माझ्या मागे आले, तर ब्रिटिश साम्राज्याला मी निश्चित हादरा देईन!"

# १६. सुखदेव

सुखदेव हा भगतसिंगाचा चुलतभाऊ. भगतसिंगानी कॉलेज सोडलं व पुढचं जीवन देशकार्यात झोकून दिलं, तेव्हापासून त्याचं मनही भगतसिंगाच्या मागोमाग जाण्यासाठी ओढ घेत होतं. इंग्रजांच्या अमानुष वृत्तीचा, सारा भारत लुबाडून नेणाऱ्या स्वार्थाचा, त्याच्या हुकूमशाहीचा त्यालाही तिटकारा वाटत होता.

एक दिवस घरी कुठलाच थांगपत्ता लागू न देता तो चंद्रशेखराना भेटला. आपला हेतू सांगताच तो त्यांच्या संस्थेत दाखल झाला थोड्याच दिवसात घनिष्ठ परिचयामुळे त्याचं चंद्रशेखरांशी उत्तम सूत जमलं. सुखदेव त्याचे व भगतसिंगाचे विचार ऐकून घेई. आपलेही सांगे. सर्वांच्या विचारांनी पुढच्या योजना ठरत.

सुखदेव जात्या हुशार होता तसाच कल्पक होता. बॉंब कसे तयार करावे याबद्दल त्याचे विचार चालू होते. सेनापती बापट यांची पुस्तकं त्यानं नीट वाचली. त्यासाठी लागणारं रसायन कुठे व कसं मिळेल याचा शोध घेतला. ते मिळवलं. त्याचं प्रमाण किती असाव याचा विचार केला. त्याचा बॉंब तयार करण्याचा विचार निश्चित ठरला!

लाहोरमधील काश्मीर बिल्डिंगमध्ये त्यानं वरच्या मजल्यावरची एका टोकाची खोली भाड्यानं घेतली. त्या खोलीत त्याचे नवे प्रयोग सुरू झाले. रात्रीच्या वेळी चंद्रशेखर, भगत हेही तिथे येत. सर्वांची मोकळ्या मनानं चर्चा चाले.

सुखदेवचा प्रयोग यशस्वी झाला होता. त्याचा प्रत्यय पाहाण्याचा त्यानं विचार केला. आपला विचार चंद्रशेखर व भगतसिंग यांना त्यानं

सांगितला. त्यांना तो पटला. लाहोर शहरापासून दूर अंतरावरील निर्मनुष्य भागात तिघेही गेले. बॉंबचा स्फोट केला. त्या आवाजानं कान-ठळया बसल्या.

चंद्रशेखरानी सुखदेवाची पाठ थोपटून शाबासकी दिली. भगतसिंग भावाकडे कौतुकानं पाहात होते. चंद्रशेखराच्या मनातील पुढच्या योजनांना नवी दिशा मिळाली होती.

चंद्रशेखर व त्याचे सहकारी अगदी गुप्त रीतीनं आपलं काम करीत होते. तरीही संधिसाधू, लाचार नोकरांनी या गुप्त घटनांची ओझरती माहिती सरकारी अधिकाऱ्यांना सांगितली.

पोलिसांकडून शोध घेण्याचं काम चालू होतं. एकदोन दिवसांतच पोलिसांनी चंद्रशेखर, सुखदेव व त्यांचा आणखी एक सहकारी यांना पकडून आणलं. वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हजर केलं.

त्या तिघांच्या चौकशीचं काम कोर्टात सुरू झालं. काहीतरी निमित्त साधून त्या तरुणांना गजाआड ठेवण्याची अधिकाऱ्याची धडपड होती. वकील दोन्ही पक्षाच्या बाजू पटवीत होते. न्यायाधीश शांतपणे ऐकून घेत होते. कायद्याच्या दृष्टिकोणातून विचार करीत होते.

चौकशीचं सर्व काम संपलं होतं. " न्यायालयासमोर कुठलाच संगतवार पुरावा आलेला नाही व आरोप सिद्ध होत नाही " या मुद्दयावर त्या तिघांनाही निर्दोष मोकळं केलं गेलं !

एका कटकटीतून मोकळं होता आलं होतं, त्यामुळं त्यांचे पुढचे उपक्रम पूर्ववत् सुरू झाले.

# १७. शिवराम राजगुरू

पुणे जिल्ह्यात खेड या नावाचा एक तालुका आहे. या खेड गावात शिवराम याचा जन्म झाला. घरची परिस्थिती बरी होती. राहाणी सनातनी होती. आई वडिलांचं देवदेवतार्चन व्यवस्थित चालू असे.

शिवरामची प्रकृती बाळपणापासून उत्तम होती. बाळवयात घरी रोज नमस्कार घालण्याच त्याच्यावर बंधनच होतं. ते तो कधी टाळीत नसे.

शिवरामचं प्राथमिक शिक्षण खेड या गावीच झाल. पुढे एकदोन वर्षं इंग्रजी शाळेतील शिक्षणही त्यान घेतलं. पण पुढे इंग्रजी शिक्षण कायमच सोडून दिलं. इग्रजी शिकून सरकारी नोकरी करावी, हा विचार त्यान कधीच केला नव्हता—त्या गुलामगिरीत आपलं सर्व जीवन लाचारीन जगण्याची त्याची इच्छा नव्हती.

खेडहून आईवडिलांचा निरोप घेऊन शिवराम काशीला गेला. त्या काळात विद्वान लोक काशीला ' संस्कृत विद्यापीठ ' मानीत. काशीत अनेक संस्कृत पंडित होते. शिवराम एका विद्वान गुरुजींकडे राहिला. संस्कृतचा चिकाटीन अभ्यास करू लागला. त्यानं ' तर्कतीर्थ ' ही पदवी मिळवली.

काशीला शिकत असतानाच क्रांतिकारकांच्या चळवळींची बरीच माहिती त्याला कळली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाव यासाठी त्या सर्वांचे चिकाटीन प्रयत्न चालले होते.

शिवरामला चंद्रशेखर आझाद यांच्या नित्याच्या सहवासातून नवी स्फूर्ती मिळाली. चंद्रशेखर हेच त्याचं स्फूर्तिस्थान होत त्यांच्याबरोबर प्रचारासाठी तो जात असे. आपल्या प्रभावी भाषणांनी श्रोत्यांच्या मनावर ते मोहिनीच घालीत. त्या भाषणाना उत्तम प्रतिसाद मिळत होता.

दिल्ली, आग्रा, जयपूर, अजमीर, कानपूर व इतर ठिकाणी शिवराम राजगुरू चंद्रशेखरांबरोबर जात असत. भगतसिंगही वेळ काढून जात असत. सर्वांच्या मनाचा ध्यास एकच : भारतमातेची पारतंत्र्यातून मुक्तता करायची !

राजगुरूंना अनेक ठिकाणी जावं लागत असे. प्रत्येक ठिकाणी ते निरनिराळ्या नावानी आपली ओळख करून देत असत. आपलं नाव 'एम.', 'एस.', 'रघुनाथ' असं दरवेळी वेगवेगळं सांगत. निरनिराळ्या ठिकाणी गेल्यावर तेथील परिस्थितीचा अचूक अंदाज घेत. लोकांशी बोलताना त्यांच्या स्वभावाची व पुढच्या कामात त्याचा किती व कसा उपयोग होईल ते पाहूनच त्यातील पसंतीच्या युवकांना आपल्या संघटनेत घेत. त्यांना पुढच्या कार्याची माहिती सांगून ते काम अत्यंत सावधगिरीनं करण्याचा इषारा देत असत.

चंद्रशेखर आझाद यांच्या योजनेनुसार भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुढच्या योजना निश्चित झाल्या होत्या. त्या कृतीत आणण्याची योग्य संधी ते पाहात होते. कुठलंही जबाबदारीचं काम करण्याची प्रत्येकाची तयारी असली, तरीसुद्धा त्या कामाची विभागणी करताना धूर्तपणानंच ती करायला हवी, हे सूत्र नेहमीच लक्षात ठेवून चंद्रशेखर पुढची पावलं टाकीत होते. त्याचा आत्मविश्वास दांडगा असला तरीही परिस्थितीचा सारासार विचार केल्याशिवाय कुठलाच धोका पत्करण्याची त्याची तयारी नसे !

# १८. आग भडकली !

भारतीय जनतेच्या मनातील असंतोष दूर करण्यासाठी व त्यांना स्वातंत्र्यपूर्व काही सवलती देण्यासाठी ब्रिटिश सरकारनं सायमन-साहेब यांना मुद्दाम भारतात पाठवलं होतं. सायमनसाहेब ओठांतून गोड बोलणारे असले, तरी त्यांच्या पोटात तो गोडपणा नव्हता ! तोंडातून बाहेर पडणारे शब्द आणि मनातले विचार यांचा मेळ कुणाला कधीच कळणारा नसे !

सायमनसाहेब आले. भारतातील पुढाऱ्यांना भेटले. त्यांच्यासमोर गोडगोड बोलले. पण मुद्याचा प्रश्न मोघम ठेवूनच भारताला कोणत्या व काय सवलती देणार ? त्या किती प्रमाणात ? या साऱ्या गोष्टी वाऱ्यावर विरल्यासारख्याच होत्या. त्या ऐकून कुणाचंच समाधान होत नव्हतं. सर्वत्र त्यांचं स्वागत निषेधानंच होत होतं. "सायमन, परत जा" अशा घोषणा उठत होत्या. दक्षिण भारतात ज्या ज्या ठिकाणी ते गेले तिथे हाच प्रकार व हाच अनुभव. मुबई-पुण्यांत तर त्यापेक्षाही जास्तच.

सायमनसाहेबांची चिकाटी मात्र मजबूत ! ते कुठल्याच विरोधानं किंवा निषेधानं खचून जात नसत. बुद्धिमत्तेच्या व वाक्पटुतेच्या देणगी-वर ते आपलं काम कळकळीनं करीत होते.

आता ते उत्तर प्रदेशाकडे वळले होते. मोठ्या शहरातून मोठ्या पुढाऱ्यांना आपले फुसके विचार पटवीत होते. पण सारं उपड्या घड्यावर पाणी !

सायमनसाहेब लाहोरला गेले होते. एका प्रचंड सभेत त्यांचं भाषण सुरू होतं : "तुम्ही इंग्रज सरकारचं ऐका ! त्यानं तुमचं कल्याण होईल.

तुम्हांला अधिक सवलती मिळतील. तुम्ही सर्वांनी सरकारला मदत केल्यावर पुढे आणखी सवलती मिळतील. सर्वांनी समजुतीनं घ्यायला हवं. मिळेल तेवढं नीट टिकवायला हवं. ते टिकवल्याची खात्री पटली की तुम्हांला जास्त सवलती मिळतीलच!"

या भावल्या भाषणानं कुणाचंही समाधान होणं शक्य नव्हतं! त्या प्रचंड जनसागरातून निषेधाची गर्जना उसळली. सर्वांच्या कानठळ्या बसवणारे वीस-पचवीस हजार श्रोत्यांचे ते कर्णकठोर आवाज शेवटी हवेत विरून गेले.

सायमनसाहेबांचं भाषण संपलं. त्याना आपली भावना कळवण्यासाठी पंजाबचे देशभक्त व पंजाबचे सिंह समजले जाणारे लाला लजपतराय उभे राहिले व सडेतोडपणे म्हणाले :

"सायमनसाहेब, तुमच्या क्षुद्र सवलतींची व अधिकारांची आम्ही भिक्षा मागत नाही! आमचे हक्क आम्हांला मिळालेच पाहिजेत. ते सरकारनं दिले पाहिजेत. भाकरीचा चतकोर तोंडावर फेकून तुम्ही आमची भूक कशी भागवणार? आम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य हवं आहे! ते मिळाल्याशिवाय कुणाचंच समाधान होणार नाही. ब्रिटिश सरकारनं ते दिलं नाही तर आमच्या मनगटांच्या जोरावर ते निश्चित मिळवू! आमची मान नेहमी ताठच राहील, हे लक्षात ठेवा!"

ही सिंहगर्जना सर्वांच्या मनात खोलवर घुमत राहिली होती.

पण ही गर्जना म्हणजे सरकारचा अपमान आहे, असं लाहोरचे पोलिस-सुपरिंटेंडेंट स्कॉट व दुय्यम पोलिस-सुपरिंटेंडेंट सॉंडर्स यांना वाटलं. त्यांनी पोलिसाना लाठीमार करण्याची आज्ञा दिली. लोकांवर लाठीचे तडाखे बसू लागले. काहींची डोकी फुटली. रक्ताच्या धारा ओघळू लागल्या. काही जमिनीवर कोसळले. लालाजींच्या डोक्यावरही लाठीचा तडाखा बसला. ते खाली पडले. त्यांना सावरण्यासाठी काही

स्वयंसेवक पुढे सरसावले. त्या गर्दीतून पोलिस-सुपरिंटेंडेंट स्कॉट पुढे आले व त्यांनी लालाजींना जोरात ठोसे मारले. एक ठोसा छातीवर बसताच लालाजी घायाळ झाले. ते बेशुद्ध पडले होते. त्यांना स्वयंसेवकांनी तावडतोब रुग्णालयात नेलं. पण वाटेतच त्यांची जीवनज्योत मालवल्याचं डॉक्टरांनी तपासणीनंतर सांगितलं. ही घटना १७ नोव्हेंबर १९२८ ला घडली.

'पंजाबचा सिंह' हरपला ही बातमी सर्व शहरात वाऱ्यासारखी पसरली. सारं शहर शोकाकुल झालं.

चंद्रशेखर आझाद यांना ही वार्ता कळली, तशीच त्यांच्या सहकाऱ्यानाही. आणि त्याचा संताप अनावर झाला. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांनी निर्धारपूर्वक सांगितलं : "या कृत्याचा आम्ही पुरेपूर सूड घेणार! स्कॉट व सॉंडर्स यांचा बदला घेऊ तेव्हाच कर्तव्यपूर्तीचं खरं समाधान आम्हांला लाभेल!"

# १९. खुनास खून !

लाला लजपतराय यांच्या हत्येचा पुरेपूर सूड घ्यायचा भगतसिंग आदी सर्वांचा मनोमन विचार ठरला होता. पण ती योजना अगदी गुप्त ठेवणं इष्ट होतं. बाहेर पसरली, तर नसती कटकट उठायची व सरकारी हेराना सुगावा लागला तर काम जाईल राहूनच, पण सरकारी कोठडीतला पाहुणचार घेत बसायची पाळी यायची !

स्कॉटसाहेब व सॉंडर्स यांच्या कार्यालयावर अगदी गुप्तपणानं व बारकाईनं लक्ष ठेवण्याचं काम संस्थेतील जयगोपाळ यानं पत्करलं होतं. तसा तो होताही चतुर. त्याचा संशय कुणालाच येणार नव्हता.

भगतसिंग, राजगुरू व सुखदेव आपापली पिस्तुलं भरून घेऊन पुढची कामं क्षणार्धात उरकणार होते. त्यांच्याबरोबर चंद्रशेखरही होतेच.

या कामासाठी १५ डिसेंबर १९२८ हा दिवस ठरवला होता. या दिवसाला सर्व जण 'क्रांतिदिन' म्हणूनच मानीत असत. शनिवार होता त्या दिवशी.

शनिवार असल्यामुळे ऑफिस नेहमीपेक्षा लवकर सुटणार, म्हणून जयगोपाळ नेहमीचा वेश पालटून ऑफिसमध्ये वावरत होता. हळूच सुगावा काढीत होता त्याला कळलं, की आज स्कॉटसाहेब रजेवर आहेत. ते कार्यालयात आलेले नाहीत.

जयगोपाळ बाहेर पडला. आपले सहकारी गुप्त ठिकाणी दबा धरून बसले होते, त्यांना त्यानं ते सांगितलं. त्यामुळे त्या दिवशीचा बेत फसला होता ! पण कुणीही निराश नव्हते. हा दिवस हुकल्यामुळे दि. १७ डिसेंबर, सोमवार हा दिवस निश्चित ठरला. सोमवारी आपली शिकार

साधायचाच हा त्या सर्वांचा निश्चय ठरला.

सोमवारी सर्व जण तयार झाले होते जयगोपाळ कार्यालयात वावरत होता. बाकीचे सहकारी कार्यालयापासून थोड्या अतरावर दबा धरून बसले होते. इशारा मिळताच पुढे सरसावणार होते.

ऑफिस सुटण्याची वेळ झाली. एकेक सेवक बाहेर पडत होता. पहिली गर्दी कमी झाली. मागून मोटारसायकलवर बसून येणारे स्कॉट-साहेब असे वेत या समजुतीन जयगोपाळने खूण करताच दबा धरून बसलेले सहकारी एका झेपेत रस्त्यावर आले सायकलवरील अधिकाऱ्या-वर आपल्या पिस्तुलातील पहिली गोळी राजगुरूनं उडवली ती अचूक लागली. अधिकारी जमिनीवर कोसळला. पण एका गोळीन सर्व काम संपल नव्हत. भगतसिंगानी पुढच सर्व काम क्षणार्धात संपवल. मोटरसायकलच्या मागे रक्षक छगनसिंग बसला होता चंद्रशेखराच्या पिस्तुलानं त्याचाही सोक्षमोक्ष लावला.

पण नंतर अधिक बारकाईनं पाहिल तेव्हा लक्षात आलं मोटर-सायकलवरून जाणारे स्कॉटसाहेब नव्हते. दुय्यम पोलीस-सुपरिंटेंडेंट सॉंडर्स होते. स्कॉटसाहेब त्या दिवशीही कार्यालयात आले नव्हते म्हणूनच ते वाचले. हा योगायोग म्हणायचा !

सर्वांनी आपल लक्ष्य साधलं होत. लालाजींच्या खुनाचा बदला 'खुनानं 'च घेतला होता ! थोड्याच वेळात ते कुठे पसार झाले ते कुणा-लाच कळल नाही !

सॉंडर्स यांच्या मृत्यूची बातमी लाहोर शहरात लगोलग पसरली. इतर ठिकाणी दुसऱ्या दिवशी कळली स्कॉटसाहेबानाही समजली.

स्कॉटसाहेब भयकर चिडले खुन्याचा तातडीनं तपास सुरू झाला. पोलिसांची धावपळ उडाली. त्याच्या हाती मात्र आतापर्यंत कुणीच मिळाल नव्हतं.

# २०. भूकंपाचा हादरा

सॉंडर्ससाहेबांच्या हत्येनंतर स्कॉटसाहेबांचे गुन्हेगारांना पकडण्याचे शिकस्तीचे प्रयत्न चालू होते. पण त्यांतून हाती काहीच लागत नव्हतं.

भगतसिंग व त्यांचे सहकारी लाहोरहून निरनिराळ्या ठिकाणी गेले होते वेष पालटून पुढे काही दिवस अज्ञातवासात राहात होते.

काही दिवसांत लाहोरची स्थिती बरीच निवळल्याचं त्यांना कळलं. पुन्हा ते सर्व लाहोरला आले. त्यांचे पुढचे नवे बेत ठरले.

सॉंडर्सच्या हत्येपेक्षाही जास्त हादरा देण्याची धाडसी योजना त्यांनी आखली होती. दिल्ली विधिमंडळाचं काम चालू असताना त्या सभागृहात बॉंब टाकायचा आणि सर्वांनाच धक्का द्यायचा, अशी त्यांची गुप्तपणानं तयारी चालू होती. लाहोरमधील काश्मिर बिल्डिंगमधल्या त्यांच्या खोलीत हा उपक्रम सुरू होता.

पूर्वतयारी पुरी झाली होती. लाहोरहून दिल्लीला जाणं मुळीच अवघड नव्हतं; पण दिल्लीला गेल्यावर विधिमंडळाचं काम सुरू असताना सभागृहात प्रवेश मिळवणं ही गोष्ट फार अवघड होती. पण ती अडचण दूर करण्याची सुखदेव यांनी खात्री दिली होती. प्रथम ते एकटेच दिल्लीला गेले. त्यांनी मोठ्या कुशलतेनं प्रयत्न चालवले होते. दोन दिवसांनी त्यांचे सहकारीही दिल्लीला येऊन भेटणार होते. पुढच्या योजना आधी ठरलेल्याच होत्या!

सुखदेवांनी मोठ्या चतुराईनं विधिमंडळात प्रवेश करण्याचे पास मिळवले होते. भगतसिंग व त्यांचे विश्वासू मित्र बटुकेश्वर दत्त दिल्लीला आले.

सुखदेवांना भेटले. सर्वांनी पुढची योजना निश्चित ठरवली. या सर्व कामगिरीबद्दल भगतसिंगानी सुखदेव याचं मनापासून कौतुक केलं.

विधिमंडळात जाण्याचा दिवस निश्चित ठरला. भगतसिंग व बटुकेशर दत्त हे दोघेही अगदी निर्विकार मनान सभागृहात शिरले. प्रेक्षकांच्या मागोमाग संथपणानं गेले व आपल्या जागी शांतपणान बसले.

विधिमंडळाचे सर्व सदस्य कामकाजाच्या हॉलमध्ये येऊन आपापल्या जागी बसले होते. अध्यक्षांच्या सूचनेनुसार कामाला सुरुवात झाली. निरनिराळ्या विषयांवर चर्चा सुरू झाली. उपस्थित प्रेक्षक शांतपणान ऐकत होते. कसली गडबड नाही, गोंगाट नाही. आरडाओरडा मुळीच नाही.

वल्लभभाई पटेल एका विषयावर आपले विचार मांडायला उभे राहिले. वल्लभभाई म्हणजे अगदी पोलादी पुरुष'! त्यांचं बोलण हेही पोलादासारख. पहिली पाचसात मिनिट त्याच भाषण खणखणीत आवाजात चालल होतं सर्व सदस्य एकचित्तान ऐकत होते. आणि....

वरच्या गॅलरीत बसलेल्या भगतसिंगांनी गुप्तपणे बरोबर आणलेला बॉंब जोरानं खाली फेकला बॉंबचा स्फोट झाला नि सर्व शांतता कोल-मडून, भीतीचा आगडोंब उसळला. रेटारेटीत प्रत्येक जण बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होता तेवढ्यात बटुकेशरांनी बरोबर आणलेला बॉंब धाडकन पडला. वरून पिस्तुलांच्या गोळ्यांचा मारा सुरू होताच! सारी जमीन हादरत होती. खुर्च्या-टेबलं दूर फेकल्यासारखी पडली होती. जणू हा एक भूकंपाचाच हादरा होता!

मोठ्या शिकस्तीन सर्व मंडळी सभागृहातून बाहेर पडली. सर्वांत समाधानाची बाब म्हणजे या प्रकारानं कुणीही मनुष्य ठार झाला नव्हता. भीतीनं मात्र सारं वातावरण धुंद झालं होत. प्रत्येक जण जीव मुठीत घेऊन पळत होता.

भगतसिंग व बटुकेशर दत्त हे अगदी शांतपणानं उभे होते. त्यांच्या चर्येवर भीतीचा कुठलाच भाव दिसत नव्हता.

सार्जंट जॉन्सन व त्यांचे सहकारी तत्परतेनं त्या दोघांसमोर आले. तरीही वरील दोघांची मनःस्थिती अगदी शांतच होती !

सार्जंट जॉन्सन व त्यांच्या सहकाऱ्यांना त्या दोघांनी शांतपणानंच सांगितलं, " बॉंब टाकणारे व पिस्तुलांतून गोळ्यांचा पाऊस पाडणारे ते आम्ही दोघेच आहोत. आम्ही आमचं कर्तव्य पार पाडलं आहे. पुढे काय करायचं ते तुम्ही ठरवायचं ! "

जॉन्सननं त्यांना अटक केली व कोठडीत नेऊन टाकलं. सारी चौकशी रीतसर झाल्यावर पुढचा निर्णय ठरणार होता....

# २१. शेवटचा निरोप

भगतसिंग, राजगुरू, सुखदेव व त्यांचे अन्य सहकारी याना सरकारनं पकडलं होतं. त्यांची न्यायालयीन चौकशी सुरू झाली होती. ठराविक दिवशी त्याना न्यायालयात हजर व्हावं लागत होतं.

क्रांतिकारकांच्या वतीनं असफअली हे काम पाहात होते. सरकारी वकील सरकारची बाजू मांडीत होते. त्यांचा युक्तिवाद, असफअली कायद्याचे नियम लक्षात ठेवून आपल्या बुद्धिसामर्थ्यानं खोडून काढीत होते. न्यायाधीश शांतपणानं सर्व ऐकत होते.

त्या बंदिकाळात क्रांतिकारकांना फारच वाईट वागणूक मिळत होती. रोजचं अन्न कमालीचं वाईट मिळे. शेवटी सर्वांनी अन्नत्यागच केला होता. पण सरकारी अधिकारी तिकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत होते. हा अन्नसत्याग्रह १४ जून १९२९ला सुरू झाला व पुढे दोनअडीच महिने चालला.

सर्व आरोपींवर राजद्रोह, बॉंब तयार करणं, शस्त्र बाळगणं, खून करणं, कट करणं असे व अशा तऱ्हेचे निरनिराळे आरोप ठेवले होते. त्या सर्वांचा सांगोपांग विचार करून न्यायाधीशानी प्रत्येकाला निरनिराळ्या शिक्षा फर्मावल्या होत्या.

भगतसिंग, राजगुरू व सुखदेव याना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती.

बटुकेश्वर दत्त, जयगोपाळ आदींना काळ्या पाण्याची सजा भोगावी लागणार होती.

चंद्रशेखर अज्ञातवासात राहात होते. ते सरकारच्या तावडीत कधीच सापडले नव्हते. त्यांची भ्रमंती कुठे चाले, तेही कळणं कठीण होतं.

शिवाय त्यांचा वेष, चेहरामोहरा पुरता बदलला होता.

भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या तिघांना फाशी देण्याचा दिवस २३ मार्च १९३१ हा ठरला.

ठरलेल्या दिवशी सकाळ होताच त्यांना तशी सूचना मिळाली. वधस्तंभाजवळ सर्व तयारी आधीच झालेली होती. तिघांनाही बेड्या घालून वधस्तंभाजवळ पोलिसपहाऱ्यात आणलं गेलं.

थोड्याच वेळात ते सर्व जगाचा शेवटचा निरोप घेणार होते तरीसुद्धा त्यांची वृत्ती पूर्णपणे शांत होती. इतकंच नव्हे, तर त्यांचा तो काळही हास्यविनोदात जात होता.

प्रत्यक्ष फासावर चढण्याची वेळ आली असताही त्यांचा सुखसंवाद चालूच होता : फासावर चढण्याचा पहिला मान कुणी घ्यायचा, त्यानंतर कोण व शेवटी कोण ? केवढं मनोधैर्य हे !

शेवटी तिघांच्या मतानं प्रथम सुखदेव, नंतर भगतसिंग व त्यानंतर राजगुरू या क्रमानं फासाच्या फळीवर चढायचं ठरलं.

प्रत्येकानं एकेक पायरी चढत जाऊन आपली मान फासात अडकवली व फळीचा खटका सुटताच प्रत्येकाची जीवनयात्रा संपली.

तिघांनी भारतमातेच्या मुक्तीसाठी हे बलिदान केलं. ते अमर झाले.

आणि चंद्रशेखर ? त्यांची तर प्रतिज्ञाच होती : "मी सरकारच्या हाती जिवंतपणी कधीच सापडणार नाही !"

आणि ती प्रतिज्ञा खरी ठरली !

चंद्रशेखर अज्ञातवासात असताना एकदा ते अलाहाबादला आपल्या स्नेह्याकडे उतरले होते. रोजचा पाहुणचार उत्तम चालू होता. गप्पात वेळ जात होता.

एक दिवस ते आपल्या स्नेह्यांबरोबर आल्फ्रेड पार्कमध्ये संध्याकाळच्या वेळी फिरायला गेले होते. पार्कच्या एका कोपऱ्यात ते गप्पा मारीत होते. त्याच वेळी गुप्तचर पोलिसअधिकारी ठाकूरसिंग व त्यांचा एक स्नेही पार्कमध्ये फिरायला आले होते. त्यांचं लक्ष कोपऱ्यात बसलेल्या या दोन व्यक्तींकडे गेलं. अधिक दक्षतेनं ते त्यांचं बोलणं ऐकू लागले. थोड्याच वेळात त्यांच्या मनाची खात्री झाली, की हे चंद्रशेखर आझाद!

ठाकूरसिंग निश्चयी स्वरात ओरडले, "हॅलो चंद्रशेखर आझाद!"

चंद्रशेखर सावध झाले. क्षणात अंगरख्याच्या आत लपवलेलं पिस्तूल त्यांनी बाहेर काढलं. झटकन त्या दोघांवर गोळ्या झाडल्या. पहिल्याच गोळीनं ठाकूरसिंग जमिनीवर कोसळले; दुसऱ्या गोळीनं त्यांचे स्नेही!

पिस्तुलाचा आवाज ऐकताच पार्कमध्ये दक्षता ठेवणारे पोलीस धावतच आले. त्यांचाही समाचार चंद्रशेखरांनी घेतला असता; पण एका अधिकाऱ्याच्या पिस्तुलाच्या गोळीनं चंद्रशेखर कायमचे खाली कोसळले.

पण चंद्रशेखरांची प्रतिज्ञा खरी झाली होती : जिवतपणी ते सरकारच्या हाती कधीच लागले नाहीत!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
आ. क्र. 23605 दिनांक 7.6.2109
विषय बा.वा. क्र. ....

# २२. नेताजी सुभाषचंद्र बोस

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कटक येथे झाला. तो दिवस होता १३-१-१८९७. त्यांचे वडील जानकीप्रसाद व आई प्रभावतीदेवी. घरचं वातावरण सनातनी वृत्तीचं होतं. प्रभावतीदेवींना धार्मिक कृत्यांची फार आवड होती. रोज देवपूजा, जपजाप्य, गीतावाचन यांत त्यांचा सकाळचा वेळ निघून जात असे. संध्याकाळी कथा-कीर्तनाला जाऊन बसत. घरी पाहुण्यांचा पसारा नेहमीच असे. सर्वांचं अगत्यानं स्वागत होत असे.

जानकीप्रसाद हे त्या काळात एक नाणावलेले वकील म्हणून प्रसिद्ध होते. घरची मूळची स्थिती चांगली होती. जानकीप्रसादांच्या कर्तृत्वानं व बुद्धिमत्तेनं ती पुढे उत्तमच सुधारली. हातात भरपूर पैसा येत होता. सढळ हातानं खर्च होत होता. घरच्या श्रीमंतीचा गर्व नसला, तरी अभिमान वाटत होता. कुणीही मनुष्य त्यांच्या घरी मदत मागायला गेला, तर रिकाम्या हाती तो कधीच परतत नसे. गरीब व हुशार मुलांच्या शिक्षणासाठी ते त्यांना हवी असणारी मदत देण्यास कधीच कुरकुरत नसत.

सुभाष वाढत होता. अंगानं भरदार दिसत होता. दिसायला तरतरीत, तेजस्वी डोळे, प्रसन्न मुद्रा व मर्यादशील बोलणं, हे पाहून त्याच्याबद्दल कुणालाही कौतुक वाटत असे.

सुभाषचं प्राथमिक शिक्षण कटक इथेच पुरं झालं. गुरुजींच्या आज्ञा पाळण्यात तो कधीच चुकत नसे. अभ्यासात हेळसांड करीत नसे. शाळेतील कुणाशीही तुसडेपणानं वागत नसे. सर्वांशी तो स्नेहभावानंच वागे. आपण

श्रीमंत व इतर मुलं गरीब, हा भेदभाव त्याच्या मनात कधीसुद्धा येत नसे. लहानपणापासूनच त्याला खरं बोलण्याची सवय लागली; ती पुढेही कायमची टिकली!

प्राथमिक शिक्षण संपताच सुभाषच्या माध्यमिक शिक्षणाला सुरुवात झाली. त्या शाळेतील शिस्त, शिक्षकांची शिकवण्याची पद्धत पाहून सुभाषला आरंभी थोडं चुकल्यासारखं वाटे. पुढे त्या सर्व गोष्टी अंगवळणी पडल्या. त्याचा अभ्यास उत्तम चालू होता. सर्वच गुरुजींचा तो एक आवडता शिष्य बनला होता. स्वभावानं उदार होता. वर्गातील मुलांना वह्या-पुस्तकाची किंवा इतर कुठलीही अडचण वाटली, तर तो ती दूर करी

दिवसामागून दिवस संपत होते. नव वर्षं उगवत होतं. सुभाष दरवर्षी उत्तम यश मिळवून वरच्या वर्गात जात होता. आता तो मॅट्रिकच्या वर्गात शिकत होता. पूर्वीपेक्षा जास्त आस्थेनं व चिकाटीनं अभ्यास सुरू होता. पुढे परीक्षा झाली. त्या काळातील या अवघड परीक्षेत त्यानं दुसरा नंबर मिळवला होता. शाळेतील गुरुजींनी त्याचं पाठ थोपटून कौतुक केलं होतं. आई-वडिलांना वाटणारा आगळा आनंद घर घुमवीत होता.

याच कालावधीत त्याच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. वेणीबाबू यांच्या शिकवणुकीतून आपल्या देशाच्या परिस्थितीची, पारतंत्र्याची व इंग्रजांच्या जुलमी वृत्तीची बरीच माहिती त्याला कळत होती. ती ऐकून त्याला एक प्रकारची चीड येई. पुष्कळ वेळा त्याच विचारात तो गुरफटे. मनात विशेष विचार किंवा शंका आली, तर तो वेणीबाबूंना विचारी. ते त्याचं मोकळ्या मनानं समाधान करीत.

मॅट्रिकच्या परीक्षेत दुसरा नंबर आल्यामुळे त्याला खूप बक्षिसं मिळाली होती. स्कॉलरशिपही मिळाली होती. आता पुढचं शिक्षण महाविद्यालयात घ्यायचं होतं. कुठे जाऊन ते घ्यावं याचा विचार चालू होता. सुभाषनं

कलकत्त्याला जायचा आपला विचार वडिलांना सांगितला. वडिलांनाही तो पसंत पडला.

कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यानं प्रवेश मिळवला. पुढच्या शिक्षणाची रीतसर सुरुवात झाली. कॉलेजचं वातावरण व शिक्षणपद्धती ही तर माध्यमिक शाळेपेक्षा खूपच निराळी वाटली. कॉलेजचं सर्वच वातावरण त्याला खूप आवडलं. या निराळ्या वातावरणातून खूप शिकता येईल ही त्याला खात्री वाटत होती.

दरवर्षी उत्तम यश मिळवून तो वरच्या वर्गात जात होता. घरच्या आनंदी वातावरणात अधिक भर पडत होती. इंटरच्या परीक्षेत त्यानं फर्स्ट क्लास मिळवला. कॉलेजातील प्राध्यापकांनी त्याचं कौतुक केलं. हे रत्न पुढेमागे स्वतःच्या तेजानं चमकलेलं दिसेल याबद्दल अनेकांना खात्री होती!

या कॉलेजात ऑफ्टन या नावाचे एक युरोपिअन प्राध्यापक होते. ते आपला विषय शिकवण्यात अत्यंत कुशल होते; पण विद्यार्थिवर्गात प्रिय नव्हते. ते हिंदी विद्यार्थ्यांना अत्यंत तुच्छतेनं वागवीत. वर्गात अपमानकारक बोलत. एकदा त्यांच्या घरी गेलेल्या कॉलेजच्या एका विद्यार्थ्याला ते तुच्छतेनं बोललेच, पण रागाच्या भरात त्यांनी त्याच्या श्रीमुखात मारली! दुसऱ्या दिवशी ती हकीगत कॉलेजवर सर्व विद्यार्थ्यांना समजली. ती ऐकून सुभाषबाबूंचा संताप अनावर झाला. ते प्राध्यापक वर्गात प्रवेश करीत असताना सुभाषबाबू रागानं त्यांच्यावर धावून गेले; पण इतर मुलांनी त्यांना आवरल्यामुळे पुढचा अनिप्रसंग टळला!

या अपराधामुळे त्या कॉलेजच्या प्राचार्यांनी सुभाषबाबूंना कॉलेजमधून काढून टाकलं. पण त्याची त्यांना मुळीच पर्वा वाटली नाही!

काही दिवसांनंतर सुभाषबाबूंची श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट झाली. त्यांचे विचार ऐकायला मिळाले. त्यांना अध्यात्माची ओढ वाटू लागली. अधिक माहिती मिळेल या आशेनं ते हिमालयात गेले. खूप शोध

घेतला. दऱ्याखोरी धुंडाळली. पण शेवटी निराशेनंच ते कलकत्त्याला परत आले.

आशुतोष मुकर्जी यांच्या ओळखीमुळे त्यांनी कलकत्त्याच्या स्कॉटिश चर्च महाविद्यालयात प्रवेश मिळवला. चिकाटीनं अभ्यास करून, ते तत्त्वज्ञान विषय घेऊन बी. ए. च्या परीक्षेत सन १९१६ मध्ये पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले.

बी. ए. झाल्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. १९२० साली ते आय. सी. एस. च्या परीक्षेत फर्स्ट क्लास मिळवून व कॉलेज-मध्ये चौथा नंबर मिळवून यशस्वी झाले. केंब्रिज विद्यालयातून पुढे मानसशास्त्र व नीतिशास्त्र हे विषय घेऊन विश्वविद्यालयाची पदवीही त्यांनी मिळवली.

आय. सी. एस. होऊन सन १९२१ च्या मध्यास ते भारतात परत आले. जनतेनं त्यांचा खूप गौरव केला. सरकारनं त्यांना मानाची व भरपूर पगाराची नोकरी देण्याचं ठरवलं तसं आज्ञापत्रही पाठवलं पण इंग्रज सरकारची नोकरी करायची नाही, हा त्यांचा बाणा होता. त्यांनी आपला नकार तेव्हाचे भारतमंत्री मॉटेग्यू यांच्याकडे पाठवून दिला.

भारतात आल्यावर त्यांनी महात्मा गांधी यांची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा केली. पण त्यातून पुढचा विचार निश्चित ठरत नव्हता. नंतर कलकत्त्याला चित्तरंजन दास यांचीही भेट झाली. चर्चा झाली. सुभाष-बाबूंना त्यांचे विचार पटले. ते त्यांचे सहकारी बनले.

इंग्लंडचे युवराज भारतभेटीस येणार होते. त्यांचा दिल्लीला भव्य सत्कार करण्याची योजना ठरली होती. इतर ठिकाणीही स्वागतसमारंभ आयोजित केलेले होते. पण या उपक्रमास सुभाषबाबूंनी विरोध केला.

कडकडीत हरताळ पाडला. सरकारनं ते आंदोलन दडपलं. सुभाषबाबूंवर खटला भरला. त्याना सहा महिन्यांची शिक्षा झाली. ती त्यांनी आनंदान स्वीकारली.

चित्तरंजन दास हे कलकत्याचे नगराध्यक्ष होते. सुभाषबाबूंची थोरवी ते पूर्णपणे जाणत होते. त्यांना त्यांनी नगरपालिकेचे ' विशेष अधिकारी ' म्हणून काम करण्याची विनंती केली. ते काम त्यानी उत्तम प्रकारे सुरू ठेवलं होत. त्या वेळी त्यांना दरमहा १५०० रु. पगार मिळत होता

त्या काळातील नगरपालिकेतील महत्त्वाची सुधारणा म्हणजे सुभाषबाबूंच्या प्रयत्नाने कलकत्यातील सर्व लहान मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळू लागल.

सुभाषबाबू कलकत्ता नगरपालिकेत नोकरी करीत होते. ती करून त्यांच्या सहकारी मित्राबरोबर इतरही काही गुप्त योजना चालू असत. कलकत्यातील क्रांतिकारकांचे ते पुढारी असावेत असा दाट संशय इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनात धुमसत होता त्यांच्या कृतींवर सरकारची करडी नजर होती. संशयावरून त्यांना जाळ्यात पकडण्यात आलं. आरोप ठेवला गेला.

पुढे त्या खटल्यात कोर्टान सुभाषबाबूंना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली व कलकत्यातून त्यांना पुढे मंडालेच्या तुरुंगात पाठवलं. मंडालेचं हवामान, खाणपिणं यांचा त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम दिसू लागला. पण सरकारनं तिकडे पूर्ण दुर्लक्षच दाखवल. शेवटी अनेक पुढाऱ्यांनी सरकारला ती वस्तुस्थिती पटवली व जर यातून काही अनिष्ट घडलं, तर ती जबाबदारी सरकारवर पडेल, सरकारी अधिकाऱ्यानी वेळीच विचार करावा, नाहीतर पुढे गभीर परिणाम दिसतील, असा इशारा दिला.

सरकारी अधिकारी दूरदर्शी होते मागचे अनुभव ते विसरले नव्हते ! मागच्यासारखाच कुणी माथेफिरू केव्हा काय करील, याची त्यांना

मनातून भीती वाटत होतीच. सुभाषबाबूंची मंडाले तुरुंगातून बिनशर्त सुटका झाली.

सुटका झाल्यानंतर सुभाषबाबू परदेशात जाऊन तेथील डॉक्टरांकडून औषधोपचार करून घेणार होते. त्याप्रमाणे ते तिकडे गेले. औषधोपचार सुरू होते. हवामान उत्तम वाटत होत. रोजचं खाणंपिणं व्यवस्थित ठेवल होतं. प्रकृती झपाट्यानं सुधारत होती. भरपूर विश्रांती मिळत होती निरनिराळी पुस्तक वाचायला मिळत होती. रिकाम्या वेळात चिंतन चालू होत. सुभाषबाबूचा तो काळ मजेत जात होता.

ते परदेशात असतानाच जर्मनीचे सूत्रधार हिटलर यांची त्यांनी भेट घेतली. त्यांच्याशी खूप चर्चा केली. ब्रिटिशाना कसा शह देता येईल व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कोणता मार्ग जास्त हितकर ठरेल, कोणाची व कशी मदत मिळेल अशा अनेक गोष्टींचा त्या दोघानी मनमोकळेपणान विचारविनिमय केला.

सुभाषबाबूंना काँग्रेसचं अध्यक्षपद दोन वेळा मिळालं होत. आपल काम ते अत्यत निष्ठेन करीत होते. पण ते करीत असताना मतभेद वाढीस लागलेले होते स्वतंत्र विचारान काम करणं कठीण होऊ लागलं. एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मोकळे झाले.

सरकारची वक्रदृष्टी पुन्हा सुभाषबाबूंकडे वळली. त्याना पुन्हा कारावास भोगण्याची पाळी आली. पण कारावासातील एकंदर व्यवस्था त्यांच्या प्रकृतीला मुळीच मानवत नव्हती. सामदामांच्या उपायानी सरकार त्याना सोडून देण शक्य नव्हत आणि सुभाषबाबूंचा स्वाभिमानही सुटणार नव्हता! शेवटी त्यानी अन्नसत्याग्रह सुरू केला. एकेक दिवस ते त्याच निर्धारानं रेटीत होते. प्रकृती खालावत होती. पुढे काय होईल

ते कुणालाच सांगता येत नव्हत ! डॉक्टर प्रकृती तपासून जात असत. त्यांनी मौनच धरल होतं. त्यामुळे सरकारी अधिकारी विचारात पडले व त्याची मुक्तता करून घरी राहाण्याची सवलत दिली. पण तिथेही त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास पोलीस होतेच ! त्यांना नजरकैदेत ठेवलेलं होतं !

घरी आल्यावर सुभाषबाबूंनी एकांतवासच पत्करला होता. ते एका स्वतंत्र खोलीत राहात. सर्व व्यवहार तिथेच होत खोलीबाहेर मुळीच पडायचं नाही. जेवणखाण तिथेच कुणालाही भेटायला परवानगी नव्हती. अगदी घरच्या मंडळींनाही. त्याचं जेवणाचं ताटही खोलीच्या दरवाज्याबाहेर ठेवून नोकर परत जायचा. त्यांनीच ते ताट पुढे घ्यायचं, जेवण झालं की दाराशी ठेवायच. नोकर ते घेऊन जायचा.

सरकारी अधिकाऱ्यांना ही सर्व माहिती त्याच्या हस्तकाकडून कळली होतीच ! सुभाषबाबूंचा हा हेकटपणाच आहे असं समजून, ते त्यांच्या बाबतीत जास्त चिकित्सेनं पाहात नसत.

सुभाषबाबूंचा एकांतवास हे एक गूढ होत. त्यांची विचारचक्रं निराळ्याच दिशेनं फिरत होती. दिवसाचा बराचसा काळ चिंतनातच जाई. बाहेर पोलीस आपलं काम दक्षतेनं करीत होते; परंतु आतील कुठलीच हालचाल त्यांना कळणं शक्य नव्हतं ! नेमून दिलेली कामं धोपटमार्गानं करीत राहाणं एवढंच त्यांना माहीत. नित्याच्या अनुभवामुळे व कुठलाच संशय दिसत नसल्यामुळे ते आपली ड्यूटी अगदी आरामाची मानीत होते.

सुभाषबाबूंचा एकांतवास सुमारे दोन महिने चालू होता. या अवधीत त्यांचा संपूर्ण कायापालट झाला होता. कुणीही त्यांना ओळखू शकलं नसत—घरातील नित्य सहवासातली मंडळीही ! त्यांचा चेहरामोहरा पुरता पालटलेला होता. भरपूर वाढलेली दाढी छातीवर विसावत होती. डोक्याचे

केस खूपच वाढलेले होते. नेहमीचा नेटका पोशाख त्यांनी पुरता सोडला होता. ते अगदी हुबेहूब पठाणी गृहस्थ आहेत, असंच कुणालाही वाटल असतं!

पूर्वतयारी उत्तम झाली होती. पुढची सर्व व्यवस्थाही योजनाबद्ध ठरली होती. मनाचा निश्चय अटळ होता : औरंगजेबाच्या कैदेतून शिवाजीमहाराज निसटले, तसच आपण भारत सोडून दूर जायचं!

शिवाजीमहाराज हीच त्यांची स्फूर्तिदेवता! मनाचा निश्चय हीच शक्ती!

१६ ऑगस्ट, १९४१ला त्यांनी पठाणी पेहराव केला. पायांत तंग तुमान, अंगात पठाणी पैरण, डोक्यावर पठाणी टोपी, पायांत जाडजूड वहाणा, हातात एक जाडजूड सोटा अशा वेशात ते मध्यरात्रीच्या सुमारास सावधगिरीने मागच्या दरवाज्यानं बाहेर पडले.

सकाळ झाली. पहाऱ्यावरील पोलीस रात्रीच्या झोपेतून जागे झाले होते चहापान करून गप्पात रंगले होते. एकदोघे विडीचे झुरके घेत होते, एकदोघे पानतंबाखू चघळत होते.

सूर्य वर सरकत होता सुभाषबाबूंच्या माणसांची आतबाहेर जा-ये सुरू होती. पण सुभाषबाबूंच्या खोलीच्या खिडक्या अजून पूर्ण बंद होत्या!

एका पोलिसान आत डोकावून पाहिलं. पण त्याला नीटसं काहीच दिसत नव्हत. त्यान दुसऱ्या पोलिसाला बोलावलं. त्यानंही पाहण्याचा प्रयत्न केला. त्यालाही आतलं काहीच दिसल नाही. त्यांनी घरातील नोकराला हळकेच पाहायला सांगितल. त्यानं दाराच्या फटीतून आत पाहिल. त्याला सर्व खोली अगदीच रिकामी दिसली!

घाबरूनच तो नोकर बाहेर आला व पोलिसाना म्हणाला, "आमचे बाबू खोलीत दिसत नाहीत! कुठे गेले ते? रात्री तर झोपले होते!"

हे ऐकताच पोलिसांची पुरी घाबरगुंडी उडाली. ते 'आ' वासून

एकमेकांकडे पाहात राहिले ! आता काय करायचं ? साहेबांना तोंड कसं दाखवायचं ? त्याच्या पोटात भीतीचा गोळाच उठला. तरीसुद्धा सारा प्रकार साहेबांना सांगायला हवाच होता !

चारही पोलीस ड्यूटी सोडून साहेबांना भेटायला गेले. साहेब त्यांच्याकडे रागानेच पाहात म्हणाले, " तुम्ही ड्यूटी सोडून आता इकडे कसे ? "

एका पोलिसान सारा प्रकार भीत भीत सांगितला. सारे शिपाई मान खाली घालून उभे होते.

" मग तुम्ही काय करीत होता रात्रभर ? हरामखोर ! लाज नाही वाटत बोलायला ? चला, चालते व्हा इथून ! नोकरी संपली असंच समजा आजपासून ! "

मिटल्या तोंडी पोलीस माघारी फिरले. पुढच भवितव्य त्यांनी ओळखलं होतं !

' सुभाषबाबू नजरकैदेतून निसटले ' ही बातमी सर्व कलकत्यात वाऱ्यासारखी पसरली. प्रत्येकाच्या चर्येवर आश्चर्याचे भाव उमटत होते. ते गेले कुठे ? कधी ? कसे ? पण याची उत्तरं कुणालाच कळत नव्हती, ताबडतोब कळणारही नव्हती !

ही बातमी दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांतूनही सगळीकडे पसरली. ती वाचून प्रत्येकाला सुभाषबाबूंच्या चातुर्याचं कौतुक वाटत होत !

आणि इंग्रज अधिकाऱ्यांना ? त्यांची विचारशक्ती गुंग झाली होती. पुढे काय घडणार, याची कुणालाच कल्पना करता येत नव्हती !

सुभाषबाबू बाहेर पडताच, त्यांच्यासाठी गाडी ठरवून ठेवलेली होती. ते सावधगिरीनं गाडीत बसले. क्षणार्धात गाडी वेगान सुरू झाली. त्यांच्या-बरोबर त्यांचा फक्त एक साथीदार होता.

कलकत्त्यापासून चाळीस-पन्नास किलोमीटर अंतर कापून ते रेल्वे-स्थानकावर आले. तिथून पुढे पेशावरला आले. तिथे गाडी बदलावी लागली नंतर ते काबूलला गेले तेथील उत्तमचद या व्यापाऱ्यानं पुढची सर्व व्यवस्था केली होती.

उत्तमचदानी त्या दोघांचं उत्तम स्वागत केलं. तिथून पुढे जाण्याची सोय आधीच केलेली होती.

काबूलहून सुभाषबाबू मॉस्कोला गेले. नंतर बर्लिनला ( जर्मनीत ) जाऊन त्यानी हिटलर याची भेट घेतली. हिटलरनीही त्यांचं योग्य स्वागत केलं. दोघांची पुन्हा चर्चा झाली सुभाषबाबूंनी त्याना पुढच्या योजना पटवल्या. हिटलरनी त्याना हवी ती मदत देण्याच आश्वासन दिलं. बर्लिनला त्यानी आपल स्वतंत्र कार्यालय सुरू केल. तिथून पुढचे सर्व कार्यक्रम नियोजनपूर्वक सुरू झाले.

कार्यालयातील कामाच्या मदतीसाठी त्याना एमिली या नावाची एक तरुणी मिळाली होती. सर्व काम गुप्तपणानं व दक्षतेन करण्याची सूचना तिला आधीच दिलेली होती. ती आपल काम उत्तम करीत असे. नुसतं कामच नव्हे, तर तिच वागणं, बोलणं व मनाच मोकळेपण हेही तसंच उत्तम होत. सुभाषबाबूना सागितलेल्या कामात ती पूर्णपणे रमली. आणि तिची मोहक दृष्टी सुभाषबाबूंच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वावर खिळली. पुढे त्याचं पर्यवसान दोघाच्या प्रेमात झाल व ती त्यांच्याशी विवाहबद्ध झाली. पुढचा काही काळ त्या दोघांनी सुखात घालवला. पुढच भीषण भवितव्य त्या दोघानाही कळल नव्हत, हा भाग निराळा !

सन १९३९ च्या सप्टेंबरमध्ये दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. इग्लंड व जर्मनी याचेही झगडे सुरू होते. इग्रज मुत्सद्दयांची झोप उडाली होती. हिटलर केव्हा चाल करील याची धास्ती वाटत होती. त्या वेळी

हिटलरचा प्रभाव फारच मोठा होता. त्यानं आपण करावयाच्या आक्रमणाचं अचूक वेळापत्रक तयार करून ठेवलं होतं.

### जर्मनीत गेल्यावर

बर्लिनला भेट झाल्यावर पुन्हा एकदा सुभाषबाबू व हिटलर यांची चर्चा झाली. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताची मुक्तता करणं हेच सुभाषबाबूंचं ध्येय होतं. सशस्त्र क्रांतीशिवाय स्वातंत्र्य मिळवणं शक्य नाही ही गोष्ट त्यांना पुरेपूर पटली होती.

सन १८५७ साली झालेला स्वातंत्र्यसंग्राम व त्यानंतर क्रांतिकारकांनी पुन्हा केलेल्या चळवळी यांची आठवण विसरली गेलेली नव्हती. त्या वेळच्या परिस्थितीत सैन्याची अधिक मदत मिळाली असती, तर ती अधिक हिताची ठरली असती.

सन १९४२ चा काळ. इंग्लंड व युरोपातील इतर राष्ट्रे यांत खूप असंतोष वाढला होता. जर्मनीतून हिटलरच्या सैनिकांनी अनेकांना चकित केलं होतं हिटलर अनेक प्रांत जिंकून घेत होता. सैनिकांचा उत्साह वाढत होता. हिटलर पुढे पुढे झेपावत होता. इतर राष्ट्रांना त्याच्याशी झुंज देणं जमत नव्हतं.

अशा वेळी सुभाषबाबूंनी विचारपूर्वक पुढच्या योजना ठरवल्या होत्या.

इंग्लंड व जर्मनी यांच्यात युद्धाचा भडका उडत होता. इंग्लंड व भारत यांचं पुरं वैर होतं. त्यांच्या गुलामगिरीत भारत जखडलेला होता. ती कोंडी फोडण्यास हीच वेळ जास्त सोयीची आहे, असं सुभाषबाबूंना वाटलं.

जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या हिंदी सैनिकांना आपल्या भाषणांनी सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यसिद्धीचं महत्त्व पटवलं होतं. त्यांच्या मनात नवी चेतना चेतवली होती. सर्वांना ते सांगणं पटलं होतं. सुभाषबाबू सांगतील तसं वागायची त्यांची तयारी होती.

सुभाषबाबूंनी ३१ मार्च या दिवशी 'आझाद हिंद सेने'ची स्थापना केली. त्या सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र. जर्मनाविरुद्ध लढणाऱ्या हिंदी सैनिकांना त्यांनी आवाहन केलं. त्यांच्या हाकेबरोबर पंचेचाळीस हजार सशस्त्र हिंदी सैनिक आझाद हिंद सेनेत सामील झाले.

सुभाषबाबूंनी कॉलेजात शिकत असताना लष्करी शिक्षण घेतलं होतं, पण ते परिपूर्ण नव्हतं. हिटलरच्या मार्गदर्शकांकडून त्यांनी ते मिळवलं. नवीन सैनिकांनाही अधिक तरबेज करण्याची व्यवस्था केली.

हिटलर व सुभाषबाबू यांचे परस्परसंबंध अधिक दृढ झाले होते. सुभाषबाबूंनी हिटलरचं मन जिंकलं होतं!

आझाद हिंद सेनेतील सर्व सैनिकांची पाहाणी करण्यात सुभाषबाबू बारकाईनं लक्ष देत. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे प्रगती दिसत होती. एकदा हिटलरला हे सर्व प्रत्यक्ष पाहायला येण्याची त्यांनी विनंती केली. हिटलरनं ती आनंदानं मान्य केली.

ठरलेल्या दिवशी हिटलरच्या उपस्थितीत सर्व सैनिकांची पाहाणी झाली. त्या सैनिकांतील शिस्त, त्यांचा खंबीरपणा, उत्साह हे सर्व पाहून हिटलरला समाधान वाटलं. त्यानं सुभाषबाबूंना पसंती दाखवली. सुभाषबाबूंचा उत्साह अधिक वाढला.

पुढची ठिणगी केव्हा पडेल व त्यानंतर कसा आगडोंब उसळलेला दिसेल, ते पाहाण्याची वेळ जवळ आली होती!

### उठाव सुरू

सुभाषबाबूंची भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याची धडपड व त्यासाठी अविरत प्रयत्न करण्याची तयारी हिटलरला पुरेपूर पटली होती. इंग्लंडच्या बाजूनं जर्मनांविरुद्ध लढणारे हजारो सैनिक सुभाषबाबूंना मिळाले होते. त्यातून लागेल ती मदत देण्यास हिटलरची तयारी होती. सुभाषबाबूंच्या

प्रयत्नांनी भारतभूमीवर स्वातंत्र्यसूर्याचा प्रकाश पाहाण्यास सर्व उत्सुक होते !

हिटलरच्या विचारानंच सुभाषबाबू जपानला गेले. टोकिओला जाऊन तेथील मुख्य अधिकाऱ्यांना भेटले. पारतंत्र्याच्या जोखडाखाली अडकून पडलेल्या भारताची मुक्तता करण्याचा आपला निर्धार त्याना पटवला. जपाननंही या कामासाठी मदत करावी अशी विनंती केली. जपान सरकारन ती लगेच मान्य केली. सुभाषबाबूंची जपानची खेप यशस्वी झाली होती. जपान सरकारचा निरोप घेऊन ते परत फिरले.

सुभाषबाबूंची पूर्वतयारी पूर्ण झाली होती. आता अधिक काळ फुकट घालवण्यात अर्थ नव्हता. सर्वांच्या मदतीन सुभाषबाबूंनी ब्रह्मदेशावर स्वारी केली. फारसे कष्ट न पडता सिंगापूर हाती आलं. पुढे अंदमानही मिळवलं. अदमानला स्वातंत्र्याचं निशाण फडकू लागलं. त्याला सर्वांनी मनोभावे नमस्कार केला.

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात अनेकांना प्राणार्पण करावं लागलं होतं. मुख्य साध्य साधल नव्हतं. पण क्रांतिकारकांनी इंग्रजांच्या मनात भीतीचे गोळे उठवले होते. भारतातील इंग्रज अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार केलं होतं. पण जुलमी सत्तेपुढे ते देशद्रोही ठरले होते !

क्रांतिकारकांची तळमळ खूप असली, तरी सैनिकांच्या पाठबळाशिवाय प्रचंड राष्ट्राशी झुंज देण ही गोष्ट फार धाडसाची होती. सत्तेपुढे टिकाव लागणं शक्य नव्हतं. आता ती अडचण नव्हती ! सुभाषबाबूंचा आत्मविश्वास अढळ होता !

सुभाषबाबूंनी हिंदी सैनिकांची मनं जिंकली होती. सैनिकांनाही सुभाषबाबूंचा मोठेपणा पटला होता. सर्वांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. पहिल्या उठावाची सुरुवात झाली होती. पण सर्वांची पुढची दृष्टी दिल्लीवर खिळली होती. मुळावर घाव घातला, की फांद्या आपोआप कोसळतातच !

तरीसुद्धा सुभाषबाबूंपुढे एक विकट अडचण होती. या सर्व कामासाठी पुरेसा पैसा त्यांच्या हाती येत नव्हता. भारतमातेच्या लेकरांना त्यांनी आपली अडचण सांगितली. ते म्हणाले:

"ज्या भारतमातेच्या पवित्र भूमीत तुम्ही जन्माला आला, तिच्या मातीन खेळला, तिच्या मांडीवर विसावला, ती माता परकी सत्तेखाली अडकून राहिली आहे. ते दुःख दूर करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. भारतमातेच्या मुक्तीसाठी मी तुम्हा प्रत्येकाला तळमळीन सुचवीत आहे, की तुम्ही या कार्यासाठी मला पैशाची मदत करा! भारतमाता दास्यमुक्त झाली की तीच तुम्हाला ते पैसे परत करील—स्वातंत्र्याचा आनंद देऊनच!"

सुभाषबाबूंची मागणी सर्वांनाच रास्त वाटली. मागचापुढचा विचार बाजूला ठेवून सर्वांनी सढळ हातान मदत द्यायला सुरुवात केली. श्रीमंत स्त्रियांनी आपले मोलाचे अलंकार सुभाषबाबूंच्या पायाशी ठेवले. कुणी पैशांची मदत केली. व्यापाऱ्यांनी आपल्या तिजोऱ्या रिकाम्या केल्या. अबलांनी आपल्या हातातील कंकण काढली. ती घेताना सुभाषबाबू गहिवरून गेले होते.

सुभाषबाबूंचे भाऊ रासबिहारी बोस यांना सुभाषबाबूंचा आवाका आता बरोबर ध्यानी आला होता. तेही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सतत झटत होते. ते सांगत: "मी सुभाषचा वयानं वडील भाऊ असलो, तरी कर्तृत्वानं तोच मोठा आहे, याचा मला अभिमान वाटतो!"

भूतकाळात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या आत्म्यांना सुभाषबाबूंच्या कार्याची निश्चित जाण असेल. त्यांनी सुभाषबाबूंच पुढचं सर्व कर्तृत्व उज्ज्वल दिसावं अशीच परमेश्वराची प्रार्थना केली असेल!

"चलो दिल्ली !"

सुभाषबाबूंचा आत्मविश्वास अधिक वाढला होता. त्यांनी इंग्रजांविरुद्ध युद्धाची घोषणा दिली. ती जगभर पसरली. सर्व जनता पुढच्या घटनांकडे डोळे लावून बसली होती !

आणि तो सोन्याचा दिवस उगवला ! तो दिवस होता २४ ऑक्टोबर १९४३ हा.

सन १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामानतर हा सोन्याचा दिवस उगवत होता. आजवर पारतंत्र्यात गुरफटलेली भारतमाता त्या बंधनातून मुक्त होणार होती !

सुभाषबाबूंनी सर्व सैनिकांसमक्ष घोषणा दिली : "चलो दिल्ली ! चलो दिल्ली !"

या मोहिमेसाठी पन्नास-साठ हजार सैनिक सज्ज होते. दिल्लीवर प्रत्यक्ष चाल करून जाण्याचा दिवस १८ मार्च १९४४ हा ठरलेला होता.

ठरल्या दिवशी सुरुवात झाली. सर्व सैनिक आवेशानं पुढे जात होते. मिळेल तो भाग जिंकीत होते. इंफाळ हा भाग त्यांनी जिंकला. पुढे जाण्याची धडपड चालू होती.

काही निकडीच्या कामासाठी सुभाषबाबूंना जपानला जाण्याची आवश्यकता होती. मोहिमेचं काम विश्वासू सहकाऱ्यांवर सोपवून ते तातडीने निघाले. काम आटपून ते लगेच परत येणार होते. ही घटना १६ ऑगस्ट ४४ या दिवसाची.

विमान वेगानं पुढे झेपावत होतं. आतील प्रवासी शांत होते. त्यात सुभाषबाबूही होते. हा प्रवास रंगून ते टोकिओ असा चालू होता.

आणि... विमानात अचानक बिघाड झाला. आतील सर्व लोकांच्या मनाला धक्का बसला. काही क्षणांत ते विमान फोर्मोसा बेटावरील एका खेड्याजवळ कोसळलं. आतील प्रवासी व त्यांच्याचबरोबर सुभाषबाबू

यांची इहलोकाची यात्रा इथेच संपली ! या दुर्दैवी घटनेमुळे पुढचे सर्वच बेत थंडावले.

सुभाषबाबूंच्या अचानक निधनाची बातमी दुसऱ्या दिवशी सगळी-कडे कळली. सारा भारत या वार्तेनं कळवळला. सर्व बंगालवर शोककळा पसरली. सुभाषबाबूंचं पुढचं सर्व कार्य अपुरं राहिलं होतं !

सुभाषबाबू जगातून गेले, पण आपली कीर्ती मागे ठेवूनच ! त्यांच्या स्फूर्तीतून भारत लवकरच स्वतंत्र होणार होता !

# १३. स्वातंत्र्यवीर सावरकर

नाशिकपासून थोड्या अंतरावर भगूर या नावाचं एक गाव आहे. तीच सावरकर यांची जन्मभूमी. त्यांचे पूर्वज कोकणात राहात होते. पण कोकणातील नित्याच्या कटकटींना कंटाळून सावरकर यांचे पणजोबा तिथून बाहेर पडले. घाटावर येऊन भगूर इथे त्यांनी बिऱ्हाड थाटलं.

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर या गावाजवळच्या एका लहानशा गावात प्रथम सावरकर कुटुंबं राहात होती. या गावाचे छोटे-छोटे भाग पडले होते. मोठ्या शहरातून निरनिराळ्या पेठा असतात तसे. त्या गावातील सावरवाडी हा एक लहानसा भाग. कोकणात अशा लहान भागांना 'कोंड' म्हणतात. या वाडीवर ब्राह्मणवस्ती होती. घरं असतील फार तर दहा-पधरा. सावरवाडी सोडून भगूरला आल्यावर त्यांच्या पणजोबांनी आपलं मूळ आडनाव सोडून दिलं. सावरवाडी या नावावरून 'सावरकर' हे नाव रूढ झालं.

या भगूर गावीच स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ साली झाला. त्यांचं नाव विनायक. पुढे त्याना 'तात्याराव' या नावानं सर्व जण ओळखीत. तशीच हाक मारीत. या लेखात त्यांचा उल्लेख तात्याराव असाच सर्वत्र केला आहे.

तात्यारावांचे वडील दामोदरपंत. ते सनातनी वृत्तीचे होते. घरी देव-भक्तीत रंगून जात. त्यांना संस्कृत वाचनाची आवड जास्त होती. अनेक ग्रंथ संग्रही होते. रोज त्यांतील काही भाग वाचला जात असे. 'नवनीता'तील

श्लोक, आर्या, अभंग त्यांना पाठ होते मधूनमधून दामोदरपंत ते म्हणत. ते सर्व ऐकूनच तात्यारावांनी लहानपणातच ते पाठ केले होते. रिकाम्या वेळात तात्याराव ते स्वच्छ व खणखणीत आवाजात म्हणत असत पुढे शाळेत गेल्यावर गुरुजींना म्हणून दाखवीत. त्यांच्या बालवयातील पाठांतराच गुरुजींना आश्चर्य वाटत असे.

तात्यारावांना दोन भाऊ व एक बहीण होती. मोठा भाऊ गणेश तथा बाबा. धाकटा नारायण. घरची सर्वच मंडळी हिंदुत्वनिष्ठ घरची परिस्थितीही आता उत्तम होती. घरात कशाचीच कमतरता नव्हती. मुलं मजेत होती. घरात आनंद उधळीत होती. सर्वांना समाधान वाटत होतं. तात्यारावाची आई कर्तव्यदक्ष होती. घरातील प्रत्येक कामात ती आस्थेनं लक्ष घालीत असे. भगूर गावात ह्या घराबद्दल सर्वांनाच कौतुक वाटत असे.

बाबांच प्रथमिक शिक्षण भगूरच्या शाळेत झालं. नतर पुढच्या शिक्षणासाठी त्यांना नाशिक इथे ठेवलं. तात्यारावांनी भगूरच्या शाळेत जायला नुकतीच सुरुवात केली होती. शाळा जुन्या वळणाची होती. चौथीपर्यंतच्या शिक्षणाची सोय होती. शाळेत दोन शिक्षक होते तेच सर्व मुलांना शिकवीत असत तात्यारावांचा अभ्यास उत्तम चालू होता. त्यांची हुशारी तेथील गुरुजींना दिसत होती. त्याचे ते आवडते विद्यार्थी होते.

दिवसामागून दिवस संपत होते. प्रत्येक वर्षी तात्यराव वरच्या वर्गात उत्तम मार्क मिळवून जात होते. चार वर्षे केव्हा संपली ते घरी कुणालाच कळलं नाही. पुढे वर्ष दीड वर्ष त्यांना काही अडचणींमुळे भगूरलाच राहावं लागलं. पण या काळात त्यानी घरी राहूनच इग्रजी शाळेतील दोन यत्तांचा अभ्यास पुरा केला.

त्यानंतर तात्याराव शिक्षणासाठी नाशिकला गेले. तिथे त्यांनी शिवाजी हायस्कूलमध्ये पुढील शिक्षणासाठी नाव घातलं. भगूरच्या शाळेपेक्षा ही

शाळा फार सुधारलेली होती. सर्व व्यवस्था उत्तम होती. गुरुजी अतिशय आस्थेनं शिकवीत या शाळेनही तात्यारावांची हुशारी शिक्षकाना कळली होती. सर्व विषयांत त्यांचा नेहमीच प्रभाव दिसत होता.

गुरुजींना वाटे, हा चुणचुणीत मुलगा पुढे नाव काढील, सर्वांना चकित करील. हिऱ्याची पारख जवाहिऱ्याच अचूक करतो तसंच हे !

नाशिक येथील सार्वजनिक गणेशोत्सवात मुलांच्या वक्तृत्वाची स्पर्धा होणार होती. त्या स्पर्धेत तात्यारावानी भाग घेतला एकेका विषयावर मुलांची भाषण होणार होती. या स्पर्धेत तात्यारावांना पहिला नंबर पटकावला. त्यांना बक्षीस मिळालं. गुरुजींनी त्यांची पाठ थोपटून कौतुक केल. घरी आईवडिलांनाही खूप समाधान वाटल.

निरनिराळी उत्तम पुस्तक वाचण हा तात्यारावाचा आवडीचा छंद. विविध प्रकारची पुस्तक वाचून त्यांची लेखनाचीही आवड वाढू लागली. त्यांनी काही लेख लिहिले. ते नाशिक येथील ' नाशिक वैभव ' या वर्तमान-पत्राच्या संपादकाना दाखवले. त्याना काही लेख आवडले. त्यांनी ते आपल्या वर्तमानपत्रात छापलेही ! त्या वेळी तात्यारावांचं वय अवघ चौदा वर्षाचं होतं !

पण... सुखाच्या आड दुःखाचे डोंगर दडलेले असतात, ते उघडया डोळ्यांना दिसत नाहीत; पण ते कोसळू लागल्यावर ते प्रत्यक्ष सोसताना काय मनःस्ताप होत असेल, तो ज्याचा त्यालाच ठाऊक ! तो इतरांना कसा कळणार ?

अगदी अल्पशा आजारान तात्यारावाची प्रेमळ आई अगदी अचानक घरातील सर्वांना निरोप घेऊन देवाघरी गेली. तात्यारावांना व त्यांच्या भावडांना कमालीच दु.ख झाल. मुलांच मातृछत्र कायमचं दुरावलं होत ! ' आई ' म्हणून तिच्या वात्सल्याचं सुख संपल होत ! दामोदरपंतांचा

संसारातला आधार संपला होता! पुढचे दिवस कसे काढायचे व मुलांचं कसं करायचं, हा विचार त्याना सतत सतावत होता. पण जन्माला येणारा मनुष्य केव्हातरी हे जग सोडून जायचाच, हा विचार करून ते आपलं मन आवरीत. आता मुलांचे वडील व त्यांची आई हे दोन्ही प्रेमभाव जोपासण्याची जबाबदारी दामोदरपंतांवर पडली. दुसरा उपायच नव्हता!

सन १८९६ साली पुण्यात प्लेगचा रोग पाहुणा म्हणून आला व पाय पसरून बसला! पुण्यातील कित्येक लोकांच्या प्राणाहुती त्यानं पचवल्या. सरकारी व्यवस्था व उपचार योग्य वेळी मिळत गेल्यामुळे त्याचा जोर पुढे मावळला. पुण्यातील वातावरण सुधारत होत. बाहेर राहायला गेलेले लोक पुन्हा परतू लागले. आपापल्या घरात येऊन राहू लागले.

पण हा पाहुणा जितका लोचट तितकाच चिवट होता! पुण्याचा पाहुणचार पुरेसा झाला नव्हता की काय कोण जाणे, त्यानं पुणं सोडलं व इतर ठिकाणी त्याची पायपीट सुरू झाली. नाशिक शहरावर त्याची वक्र-दृष्टी वळली व तिथे त्याचा आसुरी प्रभाव पसरू लागला. त्याला लहान-थोर, स्त्री-पुरुष, म्हातारेकोतारे हा भेदच कळत नव्हता. कुणाच्याही मानगुटीला बसून तो त्याला जेरीस आणीत असे!

नाशिकला सावरकर कुटुंबाकडे त्याची नजर गेली व तिथे त्यानं खरं उग्र रूप दाखवलं!

सुरुवातीला दामोदरपंतांना प्लेगची लागण झाली. त्याना सरकारी हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं. घरून बाबाराव व तात्याराव त्याचं जेवण घेऊन जात. त्यांना जेवू घालीत. थोडा वेळ बसत, नंतर परत येत. औषध-पाण्याची सर्व व्यवस्था सरकारी डॉक्टरांच्या विचारानं होत होती.

पण त्या औषधांनी उतार पडेना! शेवटी एक दिवस त्यांची प्राण-

ज्योत कायमची विझली ! सर्व मुलांच्या डोक्यावर डोंगरच कोसळला. पण ही लहान, अजाण मुलं करणार काय ? बाबा सर्वांत मोठा. तो घरातलं सर्व करीत होता. पण त्यात त्याच नीट लक्ष नसे.

एकदोन दिवस मागे पडतात तोच त्यांचे काका— बापूकाका यांना प्लेगची गाठ आली. हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागलं. पण एकदोन दिवसात ते हे जग सोडून गेले. मुलांना पुढेमागे काकांचा आधार मिळायचा, पण तो आधारवृक्षही अचानक कोलमडून पडला !

ही सकटपरंपरा इथेच थांबली नव्हती ! पुन्हा एकदोन दिवस उलटतात, तोच बाबा आणि बाळ यांनाही प्लेगच्या गाठी आल्या. त्यांना लगेच हॉस्पिटलमध्ये पाठवावं लागल. या प्रसंगी मात्र तात्याराव पुरते गांगरून गेले. पुढे काय होणार व काय पाहावं लागणार याची चिंता त्याना सारखी वाटत होती. घरून भावांसाठी दोन वेळा खाणं तयार करून त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावं लागे. संध्याकाळी घरी आल्यावर तात्याराव आंघोळ करीत. देवघरातील देवीसमोर एकाग्रतेनं बसून दोन्ही भावांचा आजार दूर व्हावा म्हणून प्रार्थना करीत. त्यासाठी देवीस्तोत्र म्हणत. कुलस्वामिनीवर त्याची नितांत श्रद्धा होती.

तात्यारावाच्या भुकेल्या भावनेला देवी पावली ! दोन्ही भावाच्या आजाराचा जोर हळूहळू ओसरला. दोनतीन दिवसांनी ते परत घरी येणार होते. तात्यारावांना डॉक्टरांनी तसं सांगितलं. त्याच्या मनावरचा ताण बराच कमी झाला; तरी अस्वस्थपणा कमी झाला नव्हता. पुढे तीन-चार दिवसानी दोघे भाऊ घरी आल्यावरच तो कमी झाला.

नाशिकची ही सर्व हकीगत कोठूरला त्यांच्या मामाना कळताच ते तावडतोब नाशिकला आले. घरातल वातावरण पाहून प्रथम गांगरून गेले. समाधान एकच ' सर्व मुलं सुरक्षित दिसली ! त्या मुलात या रोगापासून सुटलेले फक्त दोन जीव : तात्याराव व त्याची बहीण.

मामांनी त्यांना तावडतोब कोठूरला न्यायचा विचार ठरवला व त्यांना घेऊन ते आपल्या घरी आले. पुढे लवकरच मुलाची प्रकृतीही उत्तम सुधारली. तरीसुद्धा आणखी काही दिवस मामांनी त्यांना ठेवून घेतलं.

काही दिवस कोठूरला राहून ही सर्व भावंड नाशिकला आली. नाशिकच हवामान आता पुरतं सुधारल होतं. तात्यारावांचं शिक्षण पुढे चालू झाल. बाबा नोकरीत गुतले होते. बाळ शाळेत जाऊ लागला होता. बाबांचं लग्न झालं होत, म्हणून घरातील काळजीही संपली होती. बाबांची पत्नी धोरणी व विचारी होती. घरचा गाडा तिने व्यवस्थित चालू ठेवला. तात्यारावांवर तिचा जास्त लोभ व त्यांचा आपल्या वहिनीवर !

दिवस उगवत होता, मावळत होता. काळ झपाट्यानं पुढे सरकत होता. तात्यारावाचं शिक्षणही वाढत होतं. दरवर्षी पास होऊन वरच्या वर्गात जाण्याचा क्रम कधीच चुकत नव्हता.

कोठूरहून एक दिवस मामा त्यांच्या निकटच्या आप्तांच्या सांगीवरून नाशिकला आले. बाबारावांना भेटले. त्यांनी आपल्या आप्ताच्या मुलीचं तात्यारावांशी लग्न व्हावं अशी आपली इच्छा असल्याचं सुचवलं.

या सूचनेन बाबा थोडे विचारात पडले. तात्यारावांचं शिक्षण त्यांच्या लग्नापेक्षा आजच्या परिस्थितीत महत्त्वाच होतं. शिक्षण पुरं करूनच तात्यारावांच्या विवाहाचा विचार करावा असं त्यांचं मत होतं. त्यांच्या पत्नीचही. या द्विधा मनःस्थितीत तावडतोब निर्णय घेता येईना !

तात्यारावांनी बाबाची मनःस्थिती क्षणात ओळखली. ते मामांना म्हणाले, "माझ्या पुढच्या शिक्षणाची सोय जर तुमचे आप्त करीत असतील तर बाबा व मी माझ्या लग्नाचा विचार करायला तयार आहोत."

मामांचे हे आप्त म्हणजे जव्हार संस्थानचे दिवाण श्री. भाऊराव चिपळूणकर.

मामांनी तात्यारावांची इच्छा तावडतोब मान्य केली व लग्नाचा विचारही निश्चित झाला. तात्यारावांच्या समयसूचकतेच बाबाना कौतुक वाटलं, तसंच त्यांच्या पुढच्या शिक्षणाची सोय झाली याचं समधान झालं!

तात्यारावांचा विवाहसोहळा सन १९०१ च्या एप्रिल महिन्यात शक्य तितक्या साधेपणान पार पडला. तात्यारावांनी पत्नीच नाव यमुना ठेवलं. घरच्या वातावरणात आनंदाचे तुषार उडत होते. तरीसुद्धा तात्यारावांचं मन अभ्यासातून कधीच विचलित होत नव्हत. पूर्वीप्रमाणेच त्याचा अभ्यास अगदी नेटानं चालू होता. या वेळी ते मॅट्रिकचा अभ्यास करीत होते. परीक्षेत उत्तम यश मिळाव म्हणून झटत होते. नित्याच्या व्यायामात कधीच खंड पडत नव्हता. कुलस्वामिनीच्या उपासनेचा विसर पडत नव्हता. परीक्षेत उत्तम यश मिळेल हा आत्मविश्वास दृढ होता.

तात्यारावांची मट्रिकची परीक्षा सपली. आता खूप वेळ मोकळा होता. मित्रांच्या सहवासात वेळ मजेत जाई. नित्याच्या गुप्त बैठका होत होत्या विचारविनिमय चालू होता. निरनिराळी पुस्तकं वाचून त्यांच चिंतन चालू होत. व्यायामाची ओढ वाढली होती. रोज पाचशे-पाचशे जोर-बैठका, मल्लखांब व इतर प्रकारचा व्यायाम चालू होता.

१९ डिसेंबर १९०१ ला मॅट्रिकच्या परीक्षेचा रिझल्ट प्रसिद्ध झाला. तात्याराव त्या परीक्षेत उत्तम गुण मिळवून पास झाले. घरी आल्या-आल्या त्यांनी ही आनंदाची बातमी प्रथम आपल्या वहिनींना सांगितली. लगेच घरच्या सर्वांनाच ती कळली. बाबाना ती ऐकून खूप आनंद झाला. त्या आनंदाच्या भरात ते देवघरात गेले कुलस्वामिनीला नमस्कार केला. त्याच्या डोळ्यातून दोन आनंदाश्रू खाली ओघळले. देवघरातून बाहेर येताच त्यांनी तात्यारावाना कवटाळलं.

तात्यारावानी परीक्षेचा रिझल्ट कोठूरला आपल्या मामाना कळवला. पुढच्या शिक्षणाची योजनाही कळवली. भाऊराव— तात्यारावाचे श्वशुर

जव्हारहून नाशिकला आले. त्यानी आपल्या जावयाचं कौतुक केलं. " पुढच्या शिक्षणाची मुळीच चिंता नको " असं प्रेमभरानं सांगितलं. तात्यारावांचा हुरूप वाढला. त्यानी पुढच्या शिक्षणासाठी पुण्याला जायचा आपला विचार मामाना सांगितला. तो विचार मामानाही आवडला. पुणं हे शिक्षणासाठी पूर्वीपासून प्रसिद्ध. याच पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये तात्यारावांच पुढील शिक्षण सुरू झालं.

कॉलेजचं सर्वच वातावरण प्रसन्न होतं. इथे मिळणारं शिक्षण व ते देणारे विद्वान प्राध्यापक यांचा लाभ आपणाला मिळणार आहे हे समाधान तात्यारावांना अधिक महत्त्वाचं वाटलं. या कॉलेजात स्वतः लो. टिळक, आगरकर हे व असेच थोर विद्वान प्राध्यापक पूर्वी शिकवीत होते पुढे याच कॉलेजात रँग्लर परांजपे हे बाहेर मिळणारा मानाचा मोह सोडून प्राध्यापक म्हणून शिकवू लागले होते.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये उच्च शिक्षणाबरोबरच तात्यारावांचे अन्य उपक्रम सुरू होते. त्यांचे एक जुने सहकारी व मित्र वि. म. भट हेही फर्ग्युसन कॉलेजमध्येच शिकत होते. सन १९०२ मध्ये तात्यारावांनी व भट यानी फर्ग्युसन कॉलेजमध्ये 'मित्रमेळ्या'ची शाखा सुरू केली. सर्व सभासद एकत्र जमत व चर्चा करीत. चर्चेचा मुख्य भाग इंग्रज सरकारविरुद्ध वाटणारा असंतोष व परतंत्र भारत स्वतंत्र कसा करता येईल व त्यासाठी काय धडपड करायची हाच असे. पुण्यात मित्रमेळ्याच्या एकामागोमाग अनेक शाखा सुरू झाल्या. सभासदांची संख्या खूपच वाढत होती. त्या तरुणांचं रक्त सावरकर यांच्या वीरश्रीयुक्त भाषणांनी सळसळत होतं. अनेक तरुण त्यांच्या विचारांशी सहमत होत होते वाटेल ती झुंज देण्यास तयार होते. या सर्व योजना अगदी गुप्तपणानंच चालत असत. प्रत्येक सभासदाला ही गुप्ततेची व एकनिष्ठेची शपथ घ्यावी लागत असे.

सन १९०४ मध्ये मित्रमेळ्याचं रूपांतर ' अभिनव भारत 'मध्ये झालं तशी घोषणा तात्यारावांनी केली. ती सर्वांनी मानली.

' अभिनव भारत ' ही क्रांतिकारकांची गुप्त संस्था होती. या क्रांतिकारकांना आपल्या साहसी कृतीनं इंग्रजी राज्यव्यवस्था ठोकरून द्यायची होती. त्या कामात येणारे अडथळे व पुढे होणारे परिणाम यांना धैर्यानं सामोरं जायचं होतं.

सावरकर यांचं जीवन धगधगणाऱ्या अग्नीच्या ज्वालांसारखं रौद्र होतं. एकदा ते बोलायला लागले, की जे स्फुल्लिंग उसळत ते ऐकून त्यांची स्वातंत्र्यसिद्धीसाठी चालणारी धडपड आपोआप पटत असे. त्यांनी आपल्या आयुष्याचं एकच मुख्य ध्येय ठरवलं होतं ' भारताचं स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच आजन्म झगडत राहायचं ! ' मारता मारता मरावे ' हा समर्थांचा संदेश त्यांना नवी स्फूर्ती देत होता. त्यांची कुलस्वामिनी त्यांना पुढचा मार्ग दाखवून पुढे नेत होती. त्यांच्याबरोबर त्यांचे सहकारीही निर्भयतेनं पुढे येत होते. सर्वांची एकजूट अभंग होती.

तात्यारावांनी एकदा लो. टिळकांना आपल्या संस्थेत येऊन संस्थेचं कार्य पाहून जाण्याची अगत्यानं विनंती केली होती. टिळक गेलेही होते. त्यांच्या कार्याची त्यांनी प्रशंसा केली व " जे जे कराल ते अत्यंत सावधगिरीनं करीत जा " अशी सूचनाही केली.

तात्याराव फर्ग्युसन कॉलेजमधील वसतिगृहात राहात होते. तिथेही त्यांना अनेक सहकारी भेटले. त्यांच्यापैकी पुष्कळ जण ' अभिनव भारत ' या संस्थेचे सभासद झाले.

कॉलेजमधील नित्याचा अभ्यास सांभाळून देशभक्तीनं प्रभावित झालेले तरुण पुढच्या योजनांची जुळणी करीत होते. सशस्त्र क्रांतीशिवाय इंग्रजांचं जुलमी वर्चस्व दूर करता येणार नाही, हा तात्याराव सावरकर

यांचा विचार सर्वांनाच पटत होता. त्या दृष्टीनं शस्त्रविद्येचा अभ्यास आणि सराव करण्यास काही युवकांनी सुरुवात केली होती.

तात्यारावांचा कॉलेजमधील अभ्यास उत्तम होताच. त्याचबरोबर वादविवादाच्या उपक्रमातही ते भाग घेत असत. त्यांचं ओजस्वी भाषण व भाषेवरील प्रभुत्व ऐकणाऱ्यांना त्यांच्या बुद्धिमत्तेचे विविध पैलू नजरेस येत असत. त्या तरुण वयातील अमोघ वाणीचं लो. टिळक, 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे, कॉलेजमधील प्राध्यापक, या सर्वांनाच कौतुक वाटत असे. सखोल अभ्यास, सुस्पष्ट विचार व सडेतोड मांडणी ही वैशिष्ट्य तात्यारावांच्या वक्तव्यात नेहमीच दिसून येत असत.

कॉलेजमध्ये शिकत असतानाच त्यांनी वकिलीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली होती. तशी सोय पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये होती. फर्ग्युसन कॉलेजमधील अभ्यास संपवून संध्याकाळी ते डेक्कन कॉलेजमध्ये जात.

स्वदेशीचा ज्वलंत अभिमान तात्यारावांच्या प्रत्येक कृतीत दिसायचा. त्या काळात परदेशी कपड्यांचा मोह अनेक लोकांना भुलवीत असे पण अशा वृत्तीचा तात्यारावांना तिटकारा वाटे. एकदा त्यांच्या व त्यांच्या निकटच्या मित्रांच्या मनात एक नवीन ऊर्मी उसळली : असे अनेक कपडे मिळवायचे व एके ठिकाणी रचून त्यांची होळी करायची. तात्याराव लोकमान्य टिळकांना भेटले व आपला विचार त्यांना सांगितला. टिळकांना तो पटला व त्यांनी अनुमतीही दिली. त्यांना एकच शंका होती, की होळी करण्याइतके कपडे मिळणार कसे ? कुठून ?

दुसऱ्याच दिवसापासून या नव्या उपक्रमाला गती मिळाली. तात्याराव व त्यांचे सहकारी यांनी एक सभा आयोजित केली. त्या सभेत तात्यारावांनी 'परकीय वस्तूंवर बहिष्कार' या विषयावर व्याख्यान दिलं. जमलेल्या श्रोतृवर्गातूनही उत्तम प्रतिसाद मिळाला व अनेकांनी परदेशी

कपडे तात्यारावांनी सांगितलेल्या ठिकाणी अगदी आनंदानं नेऊन दिले !

हा अभूतपूर्व कार्यक्रम दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी करायचा ठरला होता त्यासाठी पुण्यातील काही प्रतिष्ठित व्यक्तींना बोलावलेलं होत. त्यात भोपटकर बंधू शिवरामपंत परांजपे व लोकमान्य टिळक यांनाही आमंत्रित केलेलं होतं.

दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी जमलेले सर्व कपडे एका खटाऱ्यात रचले. त्यावर खूप गुलाल उधळला. वाजतगाजत ते मिरवणुकीनं डेक्कन जिमखान्याच्या बाजूनं चालले होते. त्या मिरवणुकीत परांजपे, भोपटकर बंधू व टिळकही दिसत होते !

मिरवणूक डेक्कन जिमखान्याच्या पलीकडे एका शेतात थांबली. तिथे सर्व कपडे खाली काढले. अनेक लोक तो सोहळा पाहाण्यास जमले होते. त्या ठिकाणी सावरकरांचं पुन्हा छोटंसं भाषण झालं. " स्वदेशीचा विजय असो " अशा जयजयकारात त्या सर्व उंची परदेशी कपड्यांची होळी पेटली ! त्या ज्वाला आकाशाकडे झेपावत होत्या. जनसमुदाय तिकडे पाहात होता. दसऱ्याचं सीमोल्लंघन अशा आगळ्या थाटात पार पडलं होतं ! पुढे इंग्रजी सत्तेचंही असंच सीमोल्लंघन पाहाता यावं असं अनेकांना वाटत होत. पण तो भाग्याचा दिवस थोडा दूर होता !

सावरकरांचा हा उपक्रम सगळीकडे कळला. फर्ग्युसन कॉलेजमध्येही कळला. संस्थेच्या चालकांना तो खटकला. या कृत्यामुळे तात्यारावांना दंड झाला. वसतिगृह सोडावं लागलं. पण सावरकरप्रेमी मित्रांनी तो दंड ताबडतोब भरला. तात्याराव वसतिगृह सोडून गावातील एका परिचिताकडे राहू लागले. कॉलेजचं शिक्षण मात्र व्यवस्थित चालू होतं. पुढे परीक्षा झाली. बी. ए. च्या परीक्षेत त्यांनी उत्तम यश मिळवलं प्रथम वर्ष एलएल. बी.च्या परीक्षेचाही रिझल्ट याच्या आधीच लागला होता. त्यातही त्यांनी सुयश मिळवलं होत.

पुण्यातील मुख्य काम संपलं होतं नंतर ते नाशिकला गेले. परीक्षेतील यशाची आनंदी बातमी घरी सांगितली. सर्वांनाच आनंदाचं भरतं येऊन त्यांनी तात्यारावांचं कौतुक केलं.

आता खूप मोकळेपण मिळालं होतं वाचनात खूप वेळ जात होता. 'अभिनव भारत'चे तेथील सहकारी भेटत होते. त्यांच्या चर्चा चालू होण्याच. कुणी त्यांच्या परीक्षेतील सुयशाबद्दल अभिनंदन करून त्यांना चहापानाला बोलावीत होते तर कुणी त्यांच्या 'होळी प्रकरणा'ची चर्चा करून त्यांच्याकडून नवीन माहिती ऐकत होते. सर्वांच्या सहवासात ते दिवस अगदी मजेत जात होते.

एलएल. बी. च्या दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासासाठी तात्याराव मुंबईला गेले. एक वर्ष तिथे राहून त्यांनी तो अभ्यास पुरा केला. त्या परीक्षेतही त्यांनी उत्तम यश मिळवलं.

पुढे काय करावं, याचा निश्चय ठरला नव्हता. इंग्लंडला जाऊन आणखी शिकता आलं तर पाहावं व तेथील भारतीयांना तेथील 'अभिनव भारत'ची माहिती द्यावी असाही एक हेतू होता. पण हे जमायचं कसं ही चिंता होती.

शामजी कृष्णवर्मा हे त्या काळातील एक थोर क्रांतिकारक म्हणून गणले जात. मूळचे ते भारतातील. ते आता इंग्लंडलाच राहात होते. त्यांनी आयुष्यात स्वतःच्या बुद्धिबळावर खूप पैसे मिळवले; पण त्यांच्या क्रांतिकारक कृतीला भारतात हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही, म्हणून त्यांनी तो मार्ग सोडला व परदेशी जाऊन तेथील इंग्रजी राज्यव्यवस्थेत भारताच्या परिस्थितीची सत्यस्थिती पटवण्याचं धोरण ठेवलं. ते तेथील लोकांना पटलं; पण त्याचा उपयोग नव्हता!

इंग्लंडमधील 'इंडिया हाऊस' हे निवासस्थान ही त्यांची मोठी

कामगिरी. ती आठवण तेथील प्रत्येक भारतीयाला कधीच विसरता येणार नाही!

इंग्लंडमधील 'हायगेट' या भागात त्यांना आवडलेलं एक सुंदर व प्रशस्त घर श्यामजी यानी विकत घेतलं. त्यालाच 'इंडिया हाऊस' हे नाव दिलं. भारतातून इग्लंडमध्ये येणाऱ्यांना त्याचा उत्तम उपयोग होत असे.

पंडित शामजी कृष्णवर्मा यांनी तरुण व देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांच्या इग्लंडमधील शिक्षणासाठी एक शिष्यवृत्ती जाहीर केल्याचं तात्यारावांनी वाचल होत ती शिष्यवृत्ती आपल्याला मिळाली, तर आपल्याला इग्लंडमध्ये जाता येईल अशी आशा त्यांना वाटत होती. ती मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला व त्याला लोकमान्य टिळकांचं शिफारसपत्रही जोडलं.

पडित शामजी कृष्णवर्मा याच्याकडे तो अर्ज व लो. टिळकांचं शिफा-रसपत्र गेल्यावर पडितजींनी विचार केला. ती शिष्यवृत्ती तात्यारावांना देण्याचा निर्णय घेतला व तसं तात्यारावांना कळवलं.

ही 'शिवाजी शिष्यवृत्ती' दोन हजार रुपयांची होती. तात्यारावांना हे वृत्त कळताच खूप आनंद झाला. तरीसुद्धा ही रक्कम इंग्लंडमधील सर्व अभ्यास पूर्ण होईपर्यंत पुरणारी नव्हती. त्यांनी त्यांचे मामा व श्वशुर याना सर्व हकीगत कळवली व या कामी अधिक लागणारी मदत त्यानी द्यावी, अशी विनंती केली. ही आनंदाची बातमी भाऊरावांना कळताच ते नाशिकला आले, तात्यारावांना भेटले व त्यांची अडचण अगदी हसत-मुखानं पुरी करण्याचा आपला मनोदय सांगितला.

तात्यारावांचा उत्साह द्विगुणित झाला. ते तत्परतेनं पुढच्या तयारीला लागले. आपलं इंग्लडला जाण्याचं स्वप्न साकार झालं, याचं त्यांना समाधान वाटलं.

तात्याराव एका उच्च ध्येयासाठी इंग्लंडला जात आहेत ही बातमी त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना कळली. ते नाशिकहून जाण्यापूर्वी त्यांना प्रेमाचा निरोप देण्यासाठी एक सभा आयोजित करण्याचं सर्व मित्रमंडळींनी ठरवल.

नाशिक येथील भद्रकाली मंदिराच्या पवित्र परिसरात सभा झाली. अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सावरकरांनी छोटं भाषण केलं :

" मी माझ्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आजन्म जे करता येईल ते करीन. ते माझं कर्तव्य आहे. माझ्याबरोबर तुम्हीही आहातच ! सर्वांच्या संयुक्त कृतीन व सशस्त्र क्रांतीनं भारताचं गतवैभव पुन्हा प्रस्थापित करणं हे सर्वांचंच कर्तव्य आहे. तेच आपल्याला करायचं आहे, हे प्रत्येकान लक्षात ठेवायलाच हवं ! आज तुम्ही सर्व जण मला प्रेमानं जो निरोप देत आहात, त्याबद्दल मी तुमचा सर्वांचा आभारी आहे."

समारंभ संपला. जमलेले सहकारी तात्यारावांच्या ध्येयवृत्तीचं कौतुक करून आपापल्या घराकडे परतले.

जाण्याचा दिवस निश्चित ठरला. मुंबईहून इंग्लंडला जाणारी पर्शिया बोट ९ जून १९०६ या दिवशी निघणार होती. सर्व मंडळी बोट सुटण्यापूर्वीच धक्क्यावर आली होती. सर्वांनी तात्यारावांचं कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

सर्वांचा निरोप घेताना तात्यारावांचं मनही गहिवरून गेल. स्वजनांना सोडून ते दूर जात होते. पण एका उच्च ध्येयासाठी ! बोटीत प्रवेश करण्यापूर्वी कुणाशीही अधिक काही बोलायला त्यांना शब्दच सुचत नव्हते. पत्नीलाही ते दोन शब्द सांगू शकले नाहीत ! त्यांनी तिच्याकडे प्रेमार्द्र दृष्टीनं पाहिलं, पण त्या पाहाण्यात त्यांचे डोळेच बोलत आहेत असं त्यांच्या पत्नीला वाटल ! तात्यारावांनी बोटीत प्रवेश केला. आपला हात उंच करून ते आपल्या जागी बसले. बोटीनं किनारा सोडून गती घेतली.

## इंग्लंडला गेल्यावर

तात्यारावांचा परदेशाचा प्रवास सुरू झाला. मुंबई बंदरातून बोट सुटली. वेगानं पुढचा मार्ग मागे पडत होता. तात्याराव, त्यांनी आधीच आरक्षण केलेल्या जागेकडे गेले. तिथे जाताच त्यांचा सहप्रवासी भेटला. योग असा, की तो भारतीय होता. पंजाबमधील राहणारा. त्याचं नाव हरनामसिंग. पुढे ओळख झाली. गप्पा रंगू लागल्या. वेळ मजेत जाऊ लागला.

तात्याराव सन १९०६ च्या जुलै महिन्यात लंडनला पोचले. तिथे चार वर्षं राहाण्याची संधी मिळाली. या काळात अनेक व्याप त्यांना पुरे करायचे होते. बॅरिस्टरीची परीक्षा द्यायची होती. शक्य तितकी साहित्यसाधना, 'अभिनव भारत' संस्थेच्या वतीनं लोकजागृती, चळवळी, वर्तमानपत्रातून लेख आणि गुप्तपणानं क्रांतिकारकांची संघटना करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी करावयाचे शिकस्तीचे प्रयत्न हेच त्यांचं साध्य होतं. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता !

तात्यारावांचे पहिले दहापंधरा दिवस तेथील अनोख्या वातावरणात हिंडण्याफिरण्यात व इतर आवश्यक माहिती मिळवण्यात गेले. त्यानंतर त्यांच्या विविध कार्यांचा पसारा वाढू लागला.

लंडनला ते 'इंडिया हाऊस'मध्येच राहात होते. नित्याचे नियोजित कार्यक्रम सुरू झाले. कायद्याच्या उच्च शिक्षणाची सुरुवात झाली. घरी अभ्यासाची तयारी चालू होती. लेखनातही मन गुंतून जाई. भारतीय लोकांच्या ओळखी होत होत्या. त्या झपाट्यानं वाढत होत्या. पुढच्या कामांना वातावरण अनुकूल होईल अशी आशा वाटत होती. तसे प्रयत्नही चालू होते.

त्यांनी 'जोसेफ मॅझिनी : चरित्र व राजकारण' हे पुस्तक थोड्याच दिवसांत छापून घेतलं. राहाण्याचं क्षेत्र अपरिचित होतं. लोकांच्या मनाचा कल पूर्णपणे कळला नव्हता. एकदम जास्त धाडस करणं

धोक्याचं ठरलं असत. म्हणून त्या पुस्तकाच्या फक्त दोन हजार प्रती छापून घेतल्या. पण आश्चर्य असं, की त्या सर्व प्रती महिन्या-दीड महिन्यातच संपल्या! त्या वेळी त्याची किंमत होती फक्त दीड रुपया!

'स्वातंत्र्यसमर' म्हणजेच १८५७ सालच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास हे पुस्तकही त्यांनी लिहून पुरं केलं. पण त्या पुस्तकाची भाषा जहाल होती. मराठ्यांची मर्दुमकी स्पष्टपणे पटवताना इंग्रजी राज्यव्यवस्थे-बद्दलचा असंतोष व निष्ठुर वृत्ती त्यात स्पष्टपणे मांडली होती. ते पुस्तक इंग्लंड, फ्रान्स या ठिकाणी छापण्यास कोणी छापखानदार तयार नव्हते. शेवटी ते पुस्तक हॉलंडमध्ये छापण्याची व्यवस्था करून घ्यावी लागली. काही इंग्रज अधिकाऱ्यांना त्या पुस्तकाचा सुगावा लागला. सरकारनं त्या पुस्तकाच्या प्रसारावर बंदी घातली. पुढचं काम थंडावलं.

इंडिया हाऊसच्या ग्रंथालयात विविध विषयांची व विद्वान लेखकांची अनेक पुस्तकं होती. ती वाचण्याची संधी तात्यारावांना मिळाली, त्या संधीचा ते भरपूर उपयोग करून घेत होते.

इंग्लंडमधील आणखी एक स्तुत्य व सर्व भारतीयांना अत्यंत आवडणारा उपक्रम म्हणजे भारतात होणारे निरनिराळे सार्वजनिक उत्सव आता इंग्लंडमध्ये तात्यारावांनी सुरू केले. त्या उत्सवांना बरेच लोक जमत.

१८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम संपून आता पन्नास वर्षं पूर्ण झाली होती. त्या संग्रामाचा इथे सुवर्णमहोत्सव साजरा करावा अशी एक अभिनव कल्पना तात्यारावांच्या मनात स्फुरली. त्यांनी ती निकटच्या सहकाऱ्यांना सुचवली व त्यांच्या विचारानं तो कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम १० मे १९०७ ला उत्तम प्रकारे पार पडला. त्याचप्रमाणे २९ डिसेंबर १९०७ ला गुरू गोविंदसिंग जयंती हा उत्सवही उत्साहाने साजरा केला.

महाराष्ट्राचं गतवैभव ज्यांनी आपल्या बुद्धिचातुर्यानं, पराक्रमानं व मावळे-लोकांच्या मदतीनं पुन्हा उजळून दाखवलं व स्वराज्याची स्थापना करून

भगव निशाण फडकवलं, ते छत्रपती शिवाजीमहाराज खरे पराक्रमी ! या शिवाजीमहाराजांच्या जयंतीचा उत्सवही इंग्लंडमध्ये थाटामाटात साजरा करण्याची सुरुवात तात्यारावांनीच केली.

तात्याराव बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले. पण त्यांची क्रांतिकारक भाषणं, युद्धाला उत्तेजन देणं, संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करून इंग्रजांना सतत अस्वस्थ ठेवण्याचं धोरण या व अशा कारणांमुळे तात्यारावांना बॅरिस्टरीची सनद न देण्याचा निर्णय तेथील मुख्य अधिकाऱ्यांनी घेतला. आतापर्यंत अभ्यास करून यश पदरी पडलं होतं, पण त्याची खरी पावती मिळाली नव्हती, हा दैवयोग !

याच काळात तात्यारावांनी ' शिखांचा इतिहास ' हे पुस्तक लिहिल्यामुळे, हिंदुस्थानात पिस्तुलं पाठवल्यामुळे व राजद्रोहामुळे त्यांना अटक करण्यात आली. त्यांची सर्व प्राथमिक चौकशी लंडनला झाली; पण पुढची सर्व चौकशी भारतात व्हावी असा निर्णय घेऊन त्यांना तिथून भारतात पाठवण्याचं ठरलं.

सावरकर ' मेरिया ' बोटीने पोलिसांच्या बंदोबस्तात भारतात येण्यास निघाले. बोट भारतात येण्यास वीस-पंचवीस दिवस लागणार होते. भारतातून १९०६ साली तिकडे जाताना तात्यारावांना जो उत्साह होता, तो आता मावळला होता. तरीसुद्धा त्यांची वृत्ती शांत होती.

एक दिवस अगदी सकाळीच तात्यारावांनी पहारेकऱ्याला आपणाला शौचाला जायचं असल्याचं सांगितलं. ते आत गेले पोलीस बाहेर उभा होता. ते आत जाताच त्यांनी दार बंद केलं. अंगावरचा एक लांब कपडा काढून दारावर टाकला. आत अंधार वाढला. पोर्ट-होलमधून त्यांनी समुद्रात झेप घेतली व सपासप पोहत ते किनाऱ्याकडे चालले. पोलिसांच्या लक्षात येताच धावाधाव सुरू झाली, पाठलाग चालू झाला.

तोपर्यंत फ्रान्सच्या समुद्राच्या धक्क्यावर ते पोचले होते. आपल्याला फ्रेंच पोलिसांच्या स्वाधीन करा असं ते तेथील लोकांना सांगत होते. खिशात चार पैसेही नव्हते. मॅजिस्ट्रेटसाहेबांकडे जाऊन संरक्षण मिळवण्याचं जमत नव्हतं. पाठलाग करणारे ब्रिटिश अधिकारी पाठोपाठ आले. तेथील पोलिसांची त्यानी मूठ दाबली, तात्यारावांना ताब्यात घेतलं व पुन्हा बोटीवर नेलं. पुढचा प्रवास सुरू झाला...

पुढचं न्यायालयीन कामकाज मुबईच्या न्यायालयात सुरू झालं ते काम शक्य तितकं लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न चालू होते. पुढे काम संपलं. नंतर न्यायाधीशांनी तात्यारावांना पन्नास वर्षांची शिक्षा ठोठावली. त्या वेळी तात्यारावांचं वय पचवीस वर्षाच्या आसपास होतं. काही दिवस त्यांना डोंगरीच्या तुरुंगात ठेवलं होतं. नंतर त्यांना अंदमानला पाठवण्याची व्यवस्था झाली ( जुलै १९११ ).

तेथील कारावासात त्यांना कमालीचे हाल सोसावे लागत. पण लाचारीन त्यांची ताठ मान कधीच वाकली नाही ! अंदमानच्या कारावासात त्यांची कशीबशी दहा वर्षं गेली. नंतर त्यांना भारतातील कारागृहात आणून ठेवलं. अंदमानपेक्षा इथला त्रास कमी होता.

सन १९२१ च्या मध्यास त्याना रत्नागिरीच्या तुरुंगात आणून ठेवलं. तेथील काळ अंदमानसारखा कटकटीचा नव्हता.

रत्नागिरी येथील कारागृहात तात्यारावांना काही काळ काढाव लागला. तिथून पुन्हा १९२३ मध्ये त्यांना येरवडा येथे हलवल. तेथील वास्तव्यात त्यांनी कारागृहातील लोकांसाठी विविध उपक्रम सुरू ठेवले. याच वेळी अंदमान येथील कारावासात पर्यवेक्षक म्हणून काम करणारे गृहस्थ इथे बदलून आले होते. त्यांचा व तात्यारावाचा परिचय फार जुना होता. ते त्यांच्याशी काही वेळा गप्पाही मारीत असत.

एकदा त्यानी तात्यारावांना विचारलं, " तुम्ही कारावासातून सुटल्या-वर पुढे काय करणार ? "

तात्याराव म्हणाले, " मी बिनशर्त सुटलो तर पुन्हा राजकारणात भाग घेईन व माझं अपुरं राहिलेलं काम पुरं करण्याचा प्रयत्न करीन. जर सशर्त सुटलो तर सरकारच्या अटींनुसारच वागेन. पण सामाजिक क्षेत्रात काम करण्यात मला अधिक मोकळेपणा वाटेल. "

त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर तात्यारावांची भेट घेण्यास गेले. त्यांच्या सुटकेबद्दल दोघाची बोलणी झाली. त्याचा पुढे अधिक विचार करून तात्यारावांची ४ जानेवारी १९२४ ला कारावासातून सुटका झाली. पण त्यांना पुढेही रत्नागिरीलाच स्थानबद्ध म्हणून राहाव लागणार होतं व त्या काळात कोणत्याही राजकीय प्रकरणात भाग घेता कामा नये, असं बंधन त्यांच्यावर होतं त्याना हे आज्ञापत्र येरवडा येथील कारावासात मिळाल होत.

त्यांच्या सुटकेची वार्ता पुणे शहरात तावडतोब पसरली. लगोलग तात्यासाहेब केळकर, 'काळ'कर्ते परांजपे, भोपटकर बंधू व शेदीडशे सावरकरप्रेमी लोक येरवड्याला गेले व त्यांनी मोठ्या सन्मानान त्यांना गावात आणल. त्यांच्या सहवासात तात्यारावांचा काही काळ मजेत गेला.

## र त्ना गि री त

त्यानंतर ८ जानेवारी २४ ला तात्यारावाना पुण्याहून मुंबईला नेल व तिथून ते बोटीने रत्नागिरीला येऊन पोचले. आता पुढचा काळ अगदी शांतपणे इथे जाणार होता. ८–१–२४ ते १७–६–३७ हा काळ त्यांना रत्नागिरीत घालवावा लागला.

रत्नागिरीला असताना तिथे एक सुंदर मंदिर बांधावं व ते स्पृश्य-अस्पृश्य या सर्वांनाच खुल असावं असा विचार त्यांच्या मनात आला. तेथील परिचिताशी विचारविनिमय झाला. तो सर्वांना उचित वाटला.

त्याला पुढे अधिक चालना मिळाली. जागा ठरवली व त्या जागेवर हे मंदिर बांधायचं ठरलं.

या मंदिराची कोनशिला श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते बसवून पुढे त्या कामाला द्रुतगतीनं सुरुवात झाली.

तात्यारावांचे निकटचे परिचित श्री. भागोजीशेठ कीर यांनी या मंदिराच्या उभारणीची सर्व जबाबदारी खसंतोषानं स्वीकारली होती. सावरकरांची ही योजना त्यांना फारच पसंत पडली होती.

मंदिराचं बांधकाम शक्य तितकं सुंदर व्हावं या दृष्टीनं भागोजीशेठ कीर दक्षता घेत होते. स्वतः सूचना करीत होते. मंदिराचं काम पाहून नागरिकांनाही समाधान वाटत होतं. मंदिराचं काम पूर्ण होत आलं होतं.

२२ फेब्रुवारी १९३१ ला या मंदिरात श्रीविष्णूच्या मूर्तीची व शंकराच्या पिंडीची स्थापना करण्याचं ठरलं होतं. पण ती स्थापना करण्यास सनातनी ब्राह्मणांचा विरोध होता. पूजेसाठी कुणीच ब्राह्मण यायला तयार नव्हते! शेवटी म्हैसूरच्या आश्रमातील उपाध्यायांनी ते काम केलं. श्री. भागोजीशेठ कीर यांच्या हस्ते तो कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

या मंदिराच्या व्यवस्थेसाठी चार विश्वस्त व त्यांच्यावर एक प्रतिनिधी अशा पाच व्यक्तींची नियुक्ती केली होती. चार विश्वस्तांत एक ब्राह्मण, एक क्षत्रिय, एक वैश्य व एक हरिजन आणि प्रतिनिधी म्हणून भागोजीशेठ कीर अशा त्या व्यक्ती होत्या.

या समारंभानिमित्त सहभोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. स्पृश्य-अस्पृश्य हे सर्व एकाच पंक्तीला बसून जेवणार होते. हा प्रकार अभूतपूर्व होता!

रत्नागिरीत गृहात असतानाही तात्यारावांनी सामाजिक सुधारणेसाठी खूप प्रयत्न केले. स्पृश्य-अस्पृश्य हा भेदभाव बराच मंदावला होता. सार्वजनिक पाणवठ्यावर कुणालाच प्रतिबंध नव्हता. सार्वजनिक समारंभांत

सर्वांना एकत्र बसता येत होतं. अस्पृश्य मुलांनी शाळेत दूर बसण्याची प्रथा मोडली होती. रत्नागिरीत बरीच सुधारणा झाली होती. काही वेळा तात्यारावांची राजकारण सोडून इतर विषयांवर उत्तम भाषणं होत होती. ती ऐकायला बराच जनसमुदाय लोटत होता.

तात्यारावांचा रत्नागिरीच्या वास्तव्याचा काळ संपला होता. आता त्यांची मुक्तता होऊन ते मोकळे झाले होते.

पुढे नाशिकला त्यांचा भव्य सत्कार झाला. त्या समारंभाला प्रमुख पाहुणे डॉ. मुंजे होते. जनतेकडून प्रेमाची भेट म्हणून तात्यारावांना एकूण अकरा हजार रुपये, 'गीतारहस्य' हा ग्रंथ व मानपत्र दिलं गेलं. शंकराचार्यांनी शाल व श्रीफळ देऊन आपली भावना व्यक्त केली. हा सोहळा पाहून तात्याराव पुरते भारावून गेले.

त्यानंतरही सांगली, मिरज, कोल्हापूर, सोलापूर, देवळाली, पुणे, मुंबई या व इतर ठिकाणीही त्यांचे भव्य सत्कार झाले.

आता तात्याराव सरकारी बंधनातून पूर्ण मुक्त झाले होते. राजकारण, समाजकारण व विविध लेखन यांत त्यांचा वेळ मजेत जाई. निरनिराळ्या ठिकाणाहून त्यांना भाषणं करण्यासाठीही बोलावणी येत. ते त्या ठिकाणी जात. अगदी तळमळीनं व ओजस्वी वाणीनं आपले विचार सर्वांपुढे मांडत ते त्वेषानं बडू लागले, की त्यांची मुद्रा संतप्त दिसे. कपाळावर आठ्या चढत कानाच्या पाळ्या लालसर झालेल्या दिसत.

वयाच्या त्र्याऐंशिव्या वर्षी दि. २६ फेब्रुवारी १९६६ ला तात्यारावांची जीवनज्योत मालवली—पण त्यांच्या कृतीचा प्रकाश आजही लहानापासून थोरापर्यंत कुणीही कधीच विसरणार नाही!

BVBK-0402374